www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक **लोकरक्षणाय**

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार १८ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात

### ग्रामसेविकेला अश्लील शिवीगाळ, धमकावणी प्रकरणी ग्रामसेवक संघटनेचा काळ्याफीती लाऊन निषेध




● उरण, विशाल पाटील :

महिला ग्रामसेविकेला अश्लील भाषेत शिवीगाळ करून धमकावल्या प्रकरणी शुक्रवारी (१७) उरण ग्रामसेवक संघटनेच्या वतीने उरण पंचायत समितीच्या कार्यालयासमोरच काळ्या फिती लावून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी निषेध कार्यक्रमात सहभागी झालेल्या ग्रामसेवकांनी विस्तार अधिकाऱ्यांशी भेट घेऊन अशा वाढत्या प्रकारांना पायबंद घालण्यासाठी उपाययोजना व संबंधितांवर कारवाई करण्याचीही मागणी केली.

पान २ वर

# भाजपला पुन्हा संधी मिळाल्यास सर्वांचा मतदानाचा अधिकार संकटात – शरद पवार

● ठाणे, यश सावंत :

देशाची सत्ता ज्यांच्या हातात आहे, त्यांना पुन्हा संधी मिळाली तर, सर्वांचा मतदानाचा अधिकार संकटात येईल, असा दावा शरद पवार यांनी शुक्रवारी भिवंडीतील जाहीर सभेत बोलताना केला. देशाची घटना बदलण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना ४०० पेक्षा जास्त जागा हव्या आहेत, असा आरोपही त्यांनी यावेळी केली. .

भिवंडी लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांच्या प्रचारासाठी शरद पवार यांनी शुक्रवारी सायंकाळी जाहीर सभा घेतली. भिवंडी येथील चाविंद्रा मैदानात ही सभा पार पडली. यावेळी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे उपस्थित होते. ही निवडणूक नेहमीच्या निवडणुकीपेक्षा वेगळी आहे. या निवडणूकीत तुमचे-माझे भवितव्य काय आहे, याचा निर्णय होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र



मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना ४०० पेक्षा जास्त जागा हव्या आहेत. कारण त्यांना घटना बदलायची आहे. त्यांचे खासदार, पदाधिकारी जाहीरपणे घटना बदलण्याबद्दल वक्तव्य करत आहेत, असे शरद पवार यांनी सांगितले. ज्या दिवशी बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मतदानाचा अधिकार संकटात येईल. त्यादिवशी लोकांच्या अधिकाराचे अस्तित्त्व नष्ट होऊन या देशात मोदींच्या नेतृत्वाखाली हुकूमशाही सुरू झालेली दिसेल, असेही ते म्हणाले.

■ माझी दोन राज्यांत सरकार आहे. परंतु त्यांच्याकडे ताकद, सत्ता आहे. दिल्लीत बदल घडविला म्हणून मला कारागृहात पाठवले. मोदींना गरीबांच्या मुलांनी शाळेत जावे, चांगले आरोग्य मिळावे असे वाटत नाही. मी ५०० शाळा बनविल्या म्हणून तुम्ही मला कारागृहात टाकले हा अतिशय छोटा विचार आहे. मी दिल्लीत सर्वांना औषधोपचार मोफत दिले. कारागृहात गेल्यानंतर माझ्यावरील औषधोपचार बंद करण्यात आला. मला मधुमेहाचा त्रास आहे. मला माहिती नाही त्यांना काय करायचे होते, असा आरोप दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केला. भाजप हा पक्ष विरोधी पक्षातील सर्व नेत्यांना संपवित आहे. ४ जूनला भाजप निवडून आली तर, सुप्रिया सुळे, शरद पवार, उद्धव ठाकरे आणि आदित्यही कारागृहात जातील. त्यामुळे भाजपला कोणत्याही परिस्थितीत जिंकू देऊ नका, असेही ते म्हणाले. शरद पवार यांना भटकती आत्मा म्हणणे किती अयोग्य आहे. उद्धव ठाकरे यांना नकली संतान म्हणतात. हा मराठी माणसाचा अपमान आहे, असेही ते म्हणाले.

# कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारातील गोदामात गुटख्याची साठवणूक



● पनवेल, भावना जैन :

कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजाराच्या गोदामामध्ये यापूर्वी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकून लाखो रुपयांचा मद्यसाठा जप्त केला होता. दोन दिवसांपूर्वी लोखंड पोलाद बाजारातील गोदाम क्रमांक ४४९ मध्ये ४ लाख ८१ हजार ५०४ रुपयांचा गुटख्याचा साठा नवी मुंबई पोलिसांना सापडल्याने लोखंड पोलाद बाजारातील काळेधंदे पुन्हा एकदा उजेडात आले आहेत. नवी मुंबई पोलीस दलाचे आर्थिक गुन्हे प्रतिबंध शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी क्षीरसागर यांना कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारात अत्ताऊल्ला शेठ याच्या गोदामामध्ये प्रतिबंधित गुटख्याचा मोठा साठा असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर नवी मुंबई पोलीस दलाच्या अंमलीपदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निरज चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर बनकर, उत्तम लोखंडे, गणेश पवार, पोलीस नाईक संजय फुलकर यांच्या पथकाने सापळा रचून केलेल्या कारवाईमध्ये अताऊल्ला याच्या गोदामामध्ये प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, तंबाखुचा साठा आढळला. यापूर्वीसुद्धा याच परिसरात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटख्याचा साठा अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पकडला होता. त्यानंतरसुद्धा अताऊल्ला याने गुटख्याचा साठा केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. अताऊल्ला याला पोलीस आणि अन्न औषध प्रशासन विभागातील काही कर्मचाऱ्यांची साथ असल्याने वारंवार कारवाई होऊनही पनवेल, कळंबोली, कामोठे, तळोजा या परिसरात राजरोज पानटपऱ्यांवर गुटख्याची विक्री सुरु आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नशामुक्त नवी मुंबई ही मोहीम हाती घेतली. या मोहिमेअंतर्गत पोलिसांचे अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पथक अंमली पदार्थ विकणाऱ्यांना पकडत आहे. मात्र पोलीस व अन्न औषध प्रशासन विभागातील काही नतद्रष्ट कर्मचाऱ्यांमुळे अंमलीपदार्थ पकडण्यासाठी नेमलेल्या पोलिसांना गुटखा विक्रीकडे लक्ष्य केंद्रित करावे लागत आहे. अताउल्ला याची सखोल चौकशी केल्यावर त्याने एवढा मोठा गुटख्याचा साठा कुठून आणला. तसेच गोदामात पोलिसांनी धाड टाकण्यापूर्वी आणि धाड टाकल्यानंतर त्याने कोणकोणत्या पोलिसांना व सरकारी अधिकाऱ्यांना संपर्क केला याची सखोल चौकशी केल्यास पनवेलचा अवैध गुटखा व्यापारावर काही प्रमाणात प्रतिबंध लागू शकेल.

## परदेशी वैद्यकीय पदवीधरांना आंतरवासिता पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांची मुदतवाढ; राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून दिलासा

● मुंबई, विशाल कारंडे :



मर्यादित जागा आणि परदेशी वैद्यकीय पदवीधर विद्यार्थ्यांची अधिक संख्या यामुळे या विद्यार्थ्यांना आंतरवासिता करण्यात अडचणी येत होत्या. याची दखल घेत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने या विद्यार्थ्यांना आंतरवासिता पूर्ण करण्यासाठी मे २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. परदेशात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला भारतामध्ये प्रॅक्टिस सुरू करण्यापूर्वी परदेशी वैद्यकीय पदवीधर परीक्षा (एफएमजीई) देण्याबरोबरच रुग्णालयांमधून एक वर्ष आंतरवासिता पूर्ण करणे बंधनकारक असते. राष्ट्रीय परीक्षा मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या या परीक्षेला ३८ हजार ५३५ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३० हजार ४६ विद्यार्थी अनुतीर्ण झाले.


पान २ वर

# मतदानासाठी प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात, गैरप्रकार रोखण्यासाठी ४४ भरारी पथके

● नाशिक, सचिन कदम :

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात जिल्ह्यातील नाशिक आणि दिंडोरी या मतदारसंघासाठी २० मे रोजी मतदान होणार असून या अनुषंगाने प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. शनिवारी सायंकाळी सहा वाजता प्रचार संपणार असून यानंतर होणारे लक्ष्मी दर्शन, अवैधरित्या होणारी मद्याची देवाणघेवाण तसेच अन्य गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी दोन्ही मतदारसंघात भरारी पथके व अन्य यंत्रणा लक्ष ठेवून असल्याची माहिती जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

नागरिकांना मतदान केंद्रावर कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ



नये यासाठी आवश्यक उपायांची अंमलबजावणी सुरू आहे. अपंग, ज्येष्ठ यांच्यासाठी खास व्यवस्था आहे. मतदानापूर्वी मद्य, पैसा, वस्तू वाटप यांसह अन्य गैरप्रकारांना आळा बसावा, यासाठी दोन्ही मतदारसंघात ४४ भरारी पथके, ८२ स्थायी पथके, २४ चलचित्र सर्वेक्षण पथके, १२ चलचित्र निरीक्षण पथके, १६ पथके आंतरजिल्हा, आंतरराज्य तपासणी नाक्यासह सज्ज आहेत. भरारी व स्थायी पथकांमध्ये केंद्रीय पोलीस दलाचे सदस्य यांचा सहभाग आहे.

जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर मतदान यंत्रे पोहोचविण्यासाठी ५७० बस आणि एक हजार २५२ इतर वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघात ९५५ केंद्रांवर तर, दिंडोरी मतदारसंघात ९६१ केंद्रावर वेबकास्टिंगची पूर्वतयारी करण्यात आली आहे. २४० सुक्ष्म निरीक्षक नियुक्त करण्यात आले असून त्यांचा अहवाल मुख्य निवडणूक निरीक्षक यांच्याकडे सादर करतील. नाशिक जिल्ह्यात ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या एक हजार ६११ तसेच २३७ अपंग मतदारांच्या घरी जाऊन मतदान झाले आहे. मतदान केंद्रावर भ्रमणध्वनी वापरण्यास मनाई आहे. सर्व शासकीय, निमशासकीय कर्मचारी तसेच सर्व खासगी आस्थापना यांना शासनाने सुट्टी जाहीर केली आहे. नागरिकांनी मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

पान २ वर

# सर्वेक्षणासाठी परिचारिका व आशा स्वयंसेविकांना फक्त २० रुपये मानधन !

● नागपूर, नितीन देवळेकर :

नागपूर शहर परिसरातील विविध नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांत कार्यरत असलेल्या परिचारिका व आशा स्वयंसेविका यांच्या माध्यमातून सर्वेक्षण केले जात आहे. यासाठी आशा स्वयंसेविकांना दर दिवसाला २० रुपये मानधन मिळत आहे.

ही रक्कम नगन्य नसल्याने ३०० रुपये मानधन देण्याची मागणी मनपा अस्थायी आरोग्य कर्मचारी संघटनेने केली होती. त्यानुसार मनपाच्या आरोग्य विभागाने मानधन वाढीसाठी आरोग्य सेवा सहसंचालक



(क्षयरोग) पुणे यांना पत्र पाठवले आहे.

सर्वेसाठी आशांना दिवसाला २० रुपये मानधन मिळत आहे. दिवसाला अंदाजे ३० घरांचे सर्वेक्षण केले तर एका घरासाठी ६५ पैसे आशाला मिळतात. सातव्या वेतन आयोगाच्या काळात दिवसाला २० रुपये मानधन ही कल्पनाही करता येत नाही. त्यामुळे किमान ३०० रुपये मानधन देण्यात यावे. तसेच मे महिन्यात कडक ऊन असल्याने सर्वेक्षण एक महिना लांबणीवर टाकण्यात यावे, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष जम्मू आनंद यांनी केली होती. त्यानुसार महापालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलेकर यांनी संघटनेच्या आशा वर्कर यांची बैठक घेतली. पाचपावली केंद्रातील आशा कर्मचाऱ्यांना उन्हात सर्वे केल्याने चक्कर येवून डोके दुखी व उलट्या होत असल्याचे कर्मचाऱ्यांनी निदर्शनास आणले.

पान २ वर

# कोणताही ‘अपवाद’ नाही! केजरीवाल यांच्या जामिनाबाबत सर्वोच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अंतरिम जामीन देताना कोणताही अपवाद करण्यात आलेला नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट केले. या निर्णयासंदर्भात होत असलेल्या राजकीय दावे-प्रतिदाव्यांवर कोणतेही भाष्य करण्यास न्यायालयाने नकार दिला. दिल्ली मद्यघोटाळा प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) केलेल्या अटकेला आव्हान देणाऱ्या केजरीवाल यांच्या याचिकेवर गुरुवारी न्या. संजीव खन्ना आणि न्या. दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी ‘‘लोकांनी आम आदमी पक्षाला मते दिली, तर २ जूनला मला पुन्हा तुरुंगात जावे लागणार नाही,’’ असा दावा केजरीवाल प्रचारसभांमध्ये करीत असल्याचे महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी सांगितले. त्यावर ‘हे त्यांचे गृहीतक आहे, त्यावर आम्ही काही भाष्य करू शकत नाही,’ असे न्यायालयाने सांगितले. या प्रकरणावर भाष्य करण्यास केजरीवाल यांना मनाई करण्यात आली नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

पान २ वर

■ ‘‘त्यांनी (केजरीवालांनी) कधी शरणागती पत्करायची आहे, याबाबत आमचे आदेश स्पष्ट आहेत. हा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. या आदेशाला अनुसरून कायदा काम करेल.’’ – सर्वोच्च न्यायालय

# आता नागरिकांच्या तक्रारींचा जागेवरच होणार निपटारा; पोलिसांनी सुरू केला अनोखा उपक्रम

● पिंपरी, अभिजित येरल्लू :

नागरिकांशी थेट संवाद साधता यावा, तक्रारदारांची गैरसोय होऊ नये तसेच तक्रारींचा वेळीच निपटारा व्हावा यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या प्रत्येक पोलीस ठाण्यात दर शनिवारी तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. उद्या शनिवार (१८ मे) पासून हा उपक्रम सुरु होणार असून पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सर्व अधिकाऱ्यांना तसे आदेश दिले आहेत.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १८ पोलीस ठाणे आहेत. पुण्यापेक्षा पिंपरी-चिंचवड




आयुक्तालयाची हद्द मोठी आहे. पिंपरी-चिंचवड, चाकण, खेड-आळंदीसह तळेगाव दाभाडे हा औद्योगिक परिसर आयुक्तालयाच्या हद्दीत येतो. अनेकदा नागरिकांकडून येणाऱ्या अर्जावर काहीतरी कार्यवाही करण्यात येत असते. तर, काहीवेळेस यात थोडीफार दिरंगाई होऊ शकते. तक्रार निवारण दिनानिमित्त नागरिकांना तक्रारीवर झालेल्या कार्यवाही माहिती दिली जाईल. तसेच नागरिकांना आपल्या तक्रारी मांडता येतील. नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी आयुक्तालयामार्फत विविध माध्यमांद्वारे तक्रारी स्वीकारल्या जातात. यामध्ये संकेतस्थळ, व्हॉट्सॲप, ई-मेल तसेच प्रत्यक्षरित्या पोलीस आयुक्त कार्यालय, उपायुक्त कार्यालय, सहायक पोलीस आयुक्त कार्यालय, पोलीस ठाणे यांचा समावेश आहे. तसेच शासन आणि वरिष्ठ कार्यालयांकडून वेगवेगळ्या प्रकारचे तक्रार अर्ज प्राप्त होत असतात. या प्राप्त तक्रार अर्जांची मुदतीत व उचित कार्यवाही करून त्याचे निराकरण करणे अपेक्षित आहे. तक्रार अर्जाची वेळेत कार्यवाही न झाल्याने सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होते. नागरिकांची ही गैरसोय टाळण्यासाठी तसेच नागरिकांना अधिकाऱ्यांकडे आपली कैफियत मांडता यावी, यासाठी सर्व पोलीस ठाण्यात दर शनिवारी सकाळी साडेदहा ते दुपारी दोन यावेळेत तक्रार निवारण दिन होणार आहे. पोलीस उपायुक्त, सहायक पोलीस आयुक्त तसेच ठाणे प्रभारी अधिकारी यांच्या उपस्थितीत नागरिकांच्या तक्रारी सोडविल्या जाणार आहेत. तरी तक्रार दिनाच्या दिवशी तक्रारदारांनी संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये हजर राहण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत शनिवारपासून तीन दिवस मद्य विक्री बंद



● मुंबई, रोहित जैसवाल :

मुंबईत येत्या २० मे रोजी लोकसभेच्या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. याच पार्श्वभूमीवर, मुंबईत १८ ते २० मेदरम्यान मद्यविक्रीसाठी बंदी घालण्यात आली आहे. शनिवार, १८ मे रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून मतदान संपेपर्यंत मद्य विक्रीला बंदी करण्यात आली आहे.

मतदान कालावधीत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. येत्या १८ ते २० मे दरम्यान मुंबई शहर व उपनगरातील मद्याची सर्व दुकाने, आस्थापना बंद ठेवण्यात येणार आहेत. १८ मे रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून २० मे रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत संबंधित दुकाने बंद राहतील.

पान २ वर

## संपादकीय

# प्रादेशिक खंडपीठांची गरज काय?

सर्वोच्च न्यायालयाच्या प्रादेशिक खंडपीठांमुळे देशातील न्यायव्यवस्थेचे एकेरी स्वरुप भंग पावेल. देशातील उच्च व कनिष्ठ न्यायालयांमध्ये प्रचंड संख्येने खटले प्रलंबित असताना त्या न्यायालयांच्या सुधारणांऐवजी केंद्र सरकारचा प्रादेशिक खंडपीठाचा आग्रह अनाकलनीय आहे.

सर्वोच्च न्यायालयाची प्रादेशिक खंडपीठे स्थापन करण्याबाबत संसदेच्या स्थायी समितीने केलेली शिफारस केंद्र सरकारच्या न्यायखात्याने स्वीकारली आहे. सन २००९ मध्ये १८ व्या विधी आयोगाने सर्वोच्च न्यायालयाचे चार खंडपीठे स्थापन करण्याची शिफारस केली होती. ही चार खंडपीठे देशाच्या उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम या चार प्रादेशिक विभागांत कार्यरत राहतील.

ती अनुक्रमे दिल्ली, चेन्नई किंवा हैदराबाद, कोलकाता व मुंबई येथे स्थापन करण्यात यावी. ती संबंधित विभागातील उच्च न्यायालयांच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च अपिलीय न्यायालये म्हणून कार्यरत राहतील. त्यात घटनात्मक खटले दाखल करता येणार नाहीत. दिल्ली येथे घटनात्मक प्रकरणांवर निवाडा देण्यासाठी स्वतंत्र घटनात्मक खंडपीठ स्थापन करण्याची शिफारस विधी आयोगाने केली होती.

सर्वोच्च न्यायालय हे भारताचे सर्वोच्च अपिलीय न्यायालय आहे. देशातील विविध उच्च न्यायालयातील ज्या प्रकरणांत घटनात्मक व कायद्याचा मौलिक अर्थ लावण्याचा प्रश्न निर्माण होतो, अशी प्रकरणे सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल होतात. शिवाय मूलभूत हक्कांच्या रक्षणाचे विवाद, केंद्र, राज्य किंवा राज्यांमधील वाद-तंटे थेट सर्वोच्च न्यायालयात दाखल केले जातात.

परंतु गेल्या काही वर्षांत सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका, विशेष अपिल याचिका (स्पेशल लिव्ह पिटिशन) यांची संख्या प्रचंड वाढल्याने प्रलंबित खटल्यांचा डोंगर तयार झाला आहे. म्हणून खंडपीठांचा पर्याय सुचवला जातो.

प्रादेशिक खंडपीठांच्या कल्पनेला अनेक कारणांमुळे समर्थन मिळते. भारतासारख्या खंडप्राय देशात सर्वोच्च न्यायालयाचे भौगोलिक स्थान उर्वरित प्रदेशापासून खूपच दूर आहे. त्यामुळे पक्षकारांना न्याय मिळण्यात भौगोलिक अडथळा निर्माण होतो. सर्वोच्च न्यायालयाला फक्त घटनात्मक खटल्यांवर लक्ष केंद्रित करता येईल. प्रादेशिक खंडपीठांकडे संबंधित विभागातील दिवाणी व फौजदारी अपिलाची प्रकरणे सुनावणीस येतील.

यामुळे न्यायालयीन कार्यक्षमता व परिणामकारकता यात लक्षणीय सुधारणा होईल. विधिविषयक पायाभूत संरचना विकसित होण्यास प्रोत्साहन मिळेल. बार कौन्सिलचे लोकशाहीकरण होऊन स्थानिक वकिलांना सर्वोच्च न्यायालयात काम करण्याचा अनुभव मिळेल. प्रादेशिक खंडपीठांमुळे खटले विविध न्यायालयात विभागले जातील. यामुळे खटले निकाली निघण्याचा वेग वाढून प्रलंबित खटल्यांची संख्या कमी होईल.

प्रादेशिक खंडपीठाचे हे फायदे पाहता, सकृतदर्शनी ही कल्पना उपयुक्त भासते. परंतु यात अनेक अंगभूत दोष आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय अभिलिखित होतात व ते देशातील सर्व न्यायालयांवर बंधनकारक असतात. हे निर्णय विविध खटल्यांमध्ये पुरावा म्हणून मांडता येतात.

समजा, भिन्न खंडपीठांनी एकाच कायदेशीर तत्त्वाचा वेगळा अर्थ लावला तर अंतिम निर्णय कोणाचा ग्राह्य धरणार, कोणाचा निर्णय संपूर्ण देशभर लागू होणार, हे प्रश्न निर्माण होतील. यामुळे न्यायनिर्णयांमधील सातत्य व राष्ट्रव्यापी एकरूपता खंडित होण्याची दाट शक्यता आहे. परिणामी देशात 'न्यायशास्त्राची अनागोंदी' निर्माण होईल. त्यामुळे वर्तमान न्यायिक कार्यक्षमतेवर घातक परिणाम संभवतो.

प्रादेशिक खंडपीठांमुळे 'फोरम शॉपिंग' (अनुकूल खंडपीठात खटला दाखल करणे) ला प्रोत्साहन मिळण्याची शक्यता आहे. तसेच ही खंडपीठे भौगोलिकदृष्ट्या जवळ असल्यामुळे क्षुल्लक कारणांसाठी खटले दाखल करण्याचे प्रमाण वाढू शकते.

प्रादेशिक खंडपीठांमुळे न्यायालयीन निर्णयांमध्ये प्रादेशिक पक्षपात होण्याचा धोका आहे.

तसेच संबंधित राज्यांतील स्थानिक पातळीवर प्रबळ राजकीय हितसंबंध अस्तित्वात असल्यास प्रादेशिक खंडपीठातील निर्णयप्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. या खंडपीठांच्या स्थापनेसाठी व त्यांच्या देखरेखीसाठी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक ठरते. आधीच न्यायव्यवस्थेसाठी अपुरी वित्तीय तरतूद असताना हा नवा खर्च आर्थिक ताण निर्माण करेल.

एखाद्या प्रकरणात दिवाणी किंवा फौजदारी विषयासोबत घटनात्मक अन्वयार्थाचा प्रश्न उपस्थित झाल्यास, असा खटला नेमका कोणत्या न्यायालयात दाखल करायचा, याबाबत गोंधळ निर्माण होईल. माजी सरन्यायाधीश के.जी. बालकृष्णन यांच्या मते, प्रादेशिक खंडपीठांमुळे सर्वोच्च न्यायालयाचे संस्थात्मक विघटन होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयाने या कल्पनेचे समर्थन केले नाही.प्रादेशिक खंडपीठांमुळे एकात्मिक न्यायव्यवस्थेचे स्वरूप बिघडून पदसोपान रचनेबाबत (पद-श्रेणी रचना) गोंधळ निर्माण होईल. दिल्लीतील घटनापीठाचे न्यायाधीश व प्रादेशिक खंडपीठातील न्यायाधीश यात नेमके कोण सर्वोच्च असेल, याबाबत काहीही माहिती नाही.



## आजची चित्रोळी

उणे न कांहीं कधीं पडावें
प्रभु वाहतो चिंता !
इतरांसाठीं अर्पा जीवन
शिकवून जातो कर्ता !!

मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,
विक्रोळी, मुंबई

पान १ वरून...

### ग्रामसेविकेला अश्लील शिवीगाळ, धमकावणी...

हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका सुप्रिया घरत यांची उरण पंचायत कार्यालयात काही प्रकरणांमध्ये सुनावणी सुरू होती. सुनावणी दरम्यान त्याठिकाणी हनुमान कोळीवाडा गावातील रहिवासी रविंद्र कोळी हे आले होते. रविंद्र कोळी यांनी ग्रामसेविका सुप्रिया घरत यांच्याशी विनाकारण वाद घातला. या वादातच त्यांनी ग्रामसेविका सुप्रिया घरत यांना सर्वासमक्षच अश्लील भाषेत शिवीगाळ करुन धमकावले. याप्रकरणी ग्रामसेविका सुप्रिया घरत यांनी ग्रामसेवक संघटनेच्या माध्यमातून उरण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.या तक्रारीनंतर उरण पोलिसात गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. उरण तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये कामकाज करताना ग्रामसेवकांना नागरिकांकडून शिवीगाळ, मारहाण करण्याच्या धमक्या देण्याचे प्रकार वाढतच चालले आहेत. यामुळे काम करताना ग्रामसेवकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे.

नागरिकांकडून अशा प्रकारे होणाऱ्या घटनांपासून संरक्षण व्हावे व त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी (१७);दुपारी उरण पंचायत समितीच्या कार्यालयासमोर उरण ग्रामसेवक संघटनेच्या वतीने ग्रामसेवकांनी काळ्याफीती लाऊन निषेध व्यक्त केला.त्यानंतर त्यांनी विस्तार अधिकारी विनोद मिंडे यांची भेट घेऊन कामकाज करताना ग्रामसेवकांना सुरक्षिततेसाठी उपाययोजना आणि अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली

### परदेशी वैद्यकीय पदवीधरांना आंतरवासिता पूर्ण...

तसेच ६९३ विद्यार्थी हे गैरहजर होते. तर ७,७९६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांना आंतरवासिता करण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून ६७३ रुग्णालयांची यादी जाहीर केली आहे.

वैद्यकीय महाविद्यालयांमधील एमबीबीएस जागांच्या ७.५ टक्के जागा या विद्यार्थ्यांसाठी राखीव असतात. मात्र राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने जाहीर केलेल्या रुग्णालयातील जागांच्या तुलनेत विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांची आंतरवासिता एका वर्षात पूर्ण होणे शक्य नसल्याची तक्रार परदेशी वैद्यकीय पदवीधर विद्यार्थी आणि ऑल एफएमजी असोसिएशनने आयोगाकडे केली होती. या तक्रारीची दखल घेत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विद्यार्थ्यांना आंतरवासिता पूर्ण करण्यासाठी मे २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे आता या विद्यार्थ्यांना आंतरवासितासाठी रुग्णालय शोधण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल. दरम्यान, गतवर्षी सुमारे दोन हजार परदेशी वैद्यकीय पदवीधर डॉक्टरांना आंतरावासिता मिळण्यात अडचणींचा सामना करावा लागला होता.

### मतदानासाठी प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात,...

नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघात दिंडोरीसाठी १८ लाख ५३ हजार ३८७ तर नाशिकसाठी २० लाख ३० हजार १२४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्ह्यात दोन हजार ३१७ ठिकाणी व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात आली असून ६२२ मतदारांना वाहतूक सुविधा पुरविण्याची पूर्वतयारी आहे. यामध्ये नाशिकसाठी एक हजार ९१० तर दिंडोरीमधील एक हजार ९२२ केंद्रावर १७ हजार २८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये पाच हजार ८२ महिला कर्मचारी आहेत.

बंदोबस्ताची तयारी

नाशिक लोकसभा मतदारसंघात दोन तर, दिंडोरी मतदारसंघात चार मतदान केंद्र संवेदनशील असून सर्व केंद्रावर केंद्रीय अर्धसैनिक दल, राज्य राखीव पोलीस दलासह पोलीस आयुक्त नाशिक, पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण, जिल्हा समादेशक होमगार्ड यांच्यामार्फत बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### सर्वेक्षणासाठी आशा स्वयंसेविकांना फक्त २० रुपये मानधन !...

यावर आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेतली. मानधन वाढीचा व सर्वेक्षण पुढे ढकलण्याबाबत निर्णय घेणे शासनाच्या अधिकारात असल्याने याबाबत डॉ. दीपक सेलोकर यांनी आरोग्य उपसंचालकांना पत्र पाठवल्याची माहिती जम्मू आनंद यांनी दिली. यावेळी जम्मू आनंद यांच्यासह रेश्मा अडागळे, इंदिरा गोटाफोडे, ज्योती कावरे, भाग्यश्री फुलबांडे, सुधा केळकर, देविना रेंडके, अश्विनी सोनवणे, पूनम फुलझाळे, भारती वर्मा, सारिका अवधूत, यमुना टेकम, संगीता टेकाम व मोठ्या संख्येने आशा वर्कर्स उपस्थित होत्या.

### कोणताही 'अपवाद' नाही! केजरीवाल यांच्या...

दुसरीकडे केजरीवाल यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे नाव न घेता त्यांच्या एका विधानाचा संदर्भ दिला. न्यायालयाने केजरीवाल यांना विशेष वागणूक दिली आहे, असे अनेकांना वाटत असल्याचे सिंघवी म्हणाले. त्यावर आपण याच्या अधिक तपशिलात जाऊ इच्छित नाही, असे न्यायालयाने सांगितले. केजरीवाल यांनी आपल्या तुरुंगात जाण्याबाबत कोणतेही भाष्य केलेले नसून ते तसेच प्रतिज्ञापत्र देण्यासही तयार असल्याचे सिंघवी यांनी स्पष्ट केले.

दिल्लीतील अबकारी कर घोटाळाप्रकरणी मुख्यमंत्री केजरीवाल आणि आम आदमी पक्षाविरोधात आरोपपत्र दाखल केले जाणार असल्याची माहिती ईडीने दिली. याबाबत कार्यवाही सुरू असून लवकरच आरोपपत्र दाखल केले जाईल, असे अतिरिक्त महान्यायअभिकर्ता एस. व्ही. राजू यांनी स्पष्ट केले.

### निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत शनिवारपासून तीन...

निवडणूक कालावधीत प्रशासनाकडून गस्ती पथक तैनात करण्यात आले असून, त्या पथकांकडून अवैध मद्यविक्री, अवैध वाहतूक व अनुज्ञप्ती विहीत वेळेनंतर बंद राहावेत, यासाठी संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडून दैनंदिन, तसेच रात्री गस्त घालण्यात येत आहे. अवैध मद्याबाबतच्या तक्रारींसाठी व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ कार्यान्वित करण्यात आला आहे.

नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात सक्त कारवाई करण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक निरीक्षक डॉ. सुनील यादव यांनी दिले आहेत. अवैध मद्याबाबत तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ वर संपर्क साधावा, असेही आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# पाण्याची बचत : काळाची गरज

राज्यातील तापमानाचा पारा जसा वाढत चालला आहे तसा राज्यातील पाण्याचा साठाही आटत चालला आहे. गेल्या काही दिवसात राज्यात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात शेतीसाठी तर सोडाच पिण्यासाठीही पाणी मिळणे कठीण झाले आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळाच्या झळा जास्त जाणवत आहे. मराठवाड्यात अनेक मोठ्या प्रकल्पात पाणी साठा संपत आला आहे. राज्यातील धरण साठ्यातही सरासरी तीस ते चाळीस टक्केच पाणी शिल्लक आहे. फेब्रुवारीमध्ये राज्यातील पाणी साठा ६९ टक्के इतका होता तो आज ३५.२७ टक्क्यांवर आला आहे. राज्यभरातील धरणामधला सुमारे ३४ टक्के उपयुक्त साठा कमी झाला आहे त्यामुळे राज्यातील काही शहरांत तर दहा दिवसांतून एकदा पाणी सुटत आहे. अनेक गावांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे काही गावात पंधरा दिवसातून एकदा टँकर येतो तर काही गावात महिन्यातून एकदा टँकर येतो. पाण्यासाठी दाही दिशा अशी लोकांची अवस्था झाली आहे. पाणी मिळत नसल्याने नागरिक हैराण झाले



आहेत. राज्यातील अनेक तालुक्यात पाण्याची पातळी खालावली आहे. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. पाण्यासाठी नागरिकांवर दाही दिशा फिरण्याची वेळ आली आहे. मुकी जनावरे आणि पक्षांना देखील पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने आणि स्कायमेटने वर्तवला असल्याने पाण्याचे मोठे संकट उभे राहू शकते. शिवाय यावर्षी पावसाचे आगमन उशिरा होऊ शकते असाही अंदाज वर्तवण्यात आला आहे त्यामुळे दुष्काळाचे संकट आणखी गडद होऊ शकते. हे संकट टाळायचे असेल तर आतापासूनच पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे. उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन त्याच्या वाटपाचे नियोजन केले पाहिजे. पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात आजही २४ तास पाणी पुरवठा केला जातो. २४ तास पाण्याची चंगळ असल्याने कदाचित त्यांना पाण्याचे महत्व माहीत नसेल. पुण्या - मुंबई सारख्या शहरातील काही बेजबाबदार घटक पुरेसे पाणी मिळाल्यानंतर पाण्याची नासाडी करताना दिसतात. नळ खुले सोडून पाणी वाया घालवीत असतात. या शहरातील अनेक ठिकाणी पाण्याची नासाडी होताना दिसते. त्यामुळे या भागातही आवशक्य तितकेच पाणी सोडायला हवे. पुणे महानगरपालिकेने आठवड्यातून एक दिवस पाणी कपात करण्याचा निर्णय घेतला आहे तो स्वागतार्ह आहे त्यामुळे पुणेकरांना पाणी बचतीची सवय लागेल. मुंबई महानगरपालिकेनेही असा निर्णय घ्यायला हवा. लोकांनी पाणी जपून वापरायला हवे. भविष्यातील पाण्याचे संकट गांभीर्याने घेऊन पाण्याचा अपव्यय टाळला आणि काटकसरीने वापर केला तर पाऊस पडेपर्यंत वेळ निभावून नेता येईल. पाणी हेच जीवन आहे. थेंब न थेंब पाण्याची बचत केली पाहिजे. पाण्याची बचत करूनच आपण पाण्याची निर्मिती करू शकतो. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे ही काळाची गरज आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त १६ ते २१ मे या कालावधीत डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजना व जनजागृती उपक्रमांचे आयोजन

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्राची भौगोलिक रचना व स्थलांतरित लोकसंख्या यामुळे हे क्षेत्र हिवताप व डेंग्यू या आजारांसाठी संवेदनशील आहे. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सर्वेक्षण तसेच साप्ताहिक वेळापत्रकानुसार डासअळी नाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण तसेच राबविण्यात येणा-या जनजागृती मोहीमा यांच्या माध्यमातून प्राधान्याने हिवताप व डेंग्यू आजारांचा प्रसार रोखण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

या अनुषंगाने 16 मे 2024 रोजीच्या राष्ट्रीय डेंग्यू दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात 16 मे रोजी 'राष्ट्रीय डेंग्यू दिन' साजरा करण्यात येणार आहे. राष्ट्रीय डेंग्यू दिनाचे यावर्षीचे घोषवाक्य 'समुदायाच्या संपर्कात रहा, डेंग्यूला नियंत्रित करा ( Connect With Community, Control Dengue)' जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार डेंग्यूविषयी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी जनतेचा सक्रिय सहभाग घेऊन डेंग्यू आजारास प्रतिबंध करणे हे राष्ट्रीय डेंग्यू दिनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्याबाबत विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे.

यामध्ये महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली डेंग्यू प्रतिबंधात्मक तसेच जनजागृतीपर वेगवेगळया कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये राष्ट्रीय डेंग्यू दिनी अर्थात 16 मे रोजी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रात मोठी बांधकामे वा झोपडपट्टी अशा एकूण 38 ठिकाणी डेंग्यू जनजागृती शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे, 16 ते 21 मे 2024 या कालावधीत प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रातील खाजगी रुग्णालये, खाजगी वैद्यकिय व्यावसायिक व खाजगी प्रयोगशाळा प्रमुख यांची प्रत्यक्ष सभा घेऊन त्यांना हिवताप, डेंग्यू, साथरोग, जलजन्यरोग याबाबत संबोधित करण्यात येणार आहे.



याच 16 ते 21 मे कालावधीत डासअळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण कामगारांच्या सभा घेऊन फवारणी काम अधिक प्रभावीपणे करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

दि. 21 मे 2024 रोजी मुख्यालयातील आरोग्य विभागात आरोग्य सहाय्यक यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

डेंग्यू हा विषाणुजन्य आजार असून, डेंग्यू विषाणू संक्रमित एडिस इजिप्ती या डासाची मादी चावल्यामुळे तो प्रसारित होतो. हा एडिस इजिप्ती डास गच्चीवरील व घराच्या परिसरातील पाण्याच्या साठ्यात तसेच भंगार साहित्य, टायर्स, रिकाम्या बाटल्या, करवंटया, रंगाचे डबे, पाण्याच्या बाटल्या, घरावर टाकलेले प्लास्टिक आच्छादन, कुंडयांखालील ताट, कुलर्समधील पाणी अशा पाणी साचलेल्या ठिकाणी अंडी घालतो आणि डास उत्पत्ती होते. ही डास उत्पत्ती स्थाने होऊ न देण्याची काळजी घेणे व झाल्यास ती तात्काळ नष्ट करणे गरजेचे ठरते.

डेंग्यू आजाराची लक्षणे म्हणजे - एकाएकी तीव्र ताप येणे, तीव्र डोकेदुखी स्नायुदुखी, सांधेदुखी व उलट्या होणे, दुसऱ्या दिवसापासून तीव्र डोकेदुखी, तोंडाला कोरड पडणे, ताप कमी जास्त होणे, अंगावर पुरळ येणे अशा प्रकारची असून अशी लक्षणे आढळून आल्यास तात्काळ वैद्यकिय सल्ला घेणे आत्यंतिक गरजेचे आहे.

डेंग्यू आजार रोखण्यासाठी - आठवड्यातून एक दिवस पाण्याचा साठा असलेली सर्व भांडी रिकामी करुन घासून – पुसून कोरडी करावीत, घरातील सर्व पाणीसाठे झाकून ठेवावेत, झाकण नसल्यास कापडाने झाकावे, घराच्या परिसरातील अडगळीचे सहित्य नष्ट करुन परिसर स्वच्छ ठेवावा, डासांपासून संरक्षणासाठी घराच्या खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात व झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा, गॅलेरीत / छतावर पाणी साठेल असे भंगार सामान ठेवू नये, गळके नळ आणि पाईपलाईन वेळीच दुरुस्त करावी, कोणाताही ताप अंगावर काढू नये – अशा प्रकारची काळजी घेण्यात यावी. नवी मुंबईकर नागरिकांनी डेंग्यूला प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात आणि हिवताप / डेंग्यूची लक्षणे आढळल्यास नजिकच्या महानगरपालिका रुग्णालयात किंवा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## थोडक्यात

### आता डोंबिवली रेल्वे स्थानकात 'रेस्टॉरंट ऑन व्हील'; लवकरच निघणार निविदा




● डोंबिवली : मध्य रेल्वेवरील 'रेस्टारंट ऑन व्ही'ला प्रवाशांच्या मिळणार तुफान प्रतिसादानंतर आता मध्य रेल्वे डोंबिवली रेल्वे स्थानकाबाहेर 'रेस्टॉरंट ऑन व्ही' सुरु करण्यात येणार आहे. यांसंदर्भात येत्या- दोन तीन दिवसांत निविदा मागविण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी 'दिली आहे.

सर्व प्रथम मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात १८ ऑक्टोबर २०२१ पासून सीएसएमटीच्या १८ नंबर प्लॅटफॉर्मबाहेर रेस्टॉरंट ऑन व्हील्स सुरु केले होते. हे रेस्टॉरंट वापरातून काढून टाकलेला रेल्वे डब्यात तयार केले होते.

ज्याला बोगी-वोगी असे नाव मध्य रेल्वेकडून देण्यात आले. या रेस्टॉरंट ऑन व्हील्समध्ये ४० जणांना बसण्याची सोय असून प्रवाशांना शाकाहारी आणि मांसाहारी असा दोन्ही जेवणांचा आस्वाद घेता येतात. सीएसएमटीवरील 'रेस्टॉरंट ऑन व्ही' सुरु झाल्यापासून हजारो प्रवाशांनी 'रेस्टॉरंट ऑन व्ही'मधील खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला आहे.

आता सीएसएमटीच्या पुनर्विकासामुळे कामामुळे बंद आहे. परंतु, सीएसएमटीच्या 'रेस्टॉरंट ऑन व्ही'ला प्रवाशांच्या मिळणार तुफान प्रतिसादानंतर लोकमान्य टिळक टर्मिनसवर रेस्टॉरंट ऑन व्हील्स सुरु करण्यात आले आहे. तर, दादर रेल्वे स्थानकावर रेस्टॉरंट ऑन व्हील्स उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. आता त्याच पाठोपाठ डोंबिवली रेल्वे स्थानकाबाहेर 'रेस्टारंट ऑन व्ही' सुरु करण्याच्या निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे.

यांसंदर्भात येत्या- दोन तीन दिवसांत निविदा मागविण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. या रेस्टॉरंट ऑन व्हील्समध्ये १० टेबलसह ४० जणांना बसण्याची सोय होती. प्रवाशांना शाकाहारी आणि मांसाहारी असा दोन्ही जेवणांचा आस्वाद घेता येतात. विशेष म्हणजे येथील खाद्यपदार्थाचे दर सर्वसामान्य प्रवाशांना पुरवेल इतके होते. त्यामुळे प्रवाशांमध्ये अत्यंत कमी कालावधीत रेस्टॉरंट ऑन व्हील्स लोकप्रिय झाले होते.

### मुरबाड मधील गजानन सुरोशी झाले भावूक..



● "मुरबाड - भिवंडी लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार तसेच जिजाऊ संघटना महाराष्ट्र अध्यक्ष निलेश सांबरे यांनी केलेल्या समाजकार्यामुळे असंख्य नागरिकांना लाभ झाल्याच्या अनेक घटना आपण ऐकल्या आहेत. असाच एक अनुभव सांबरे यांच्या प्रचार दौऱ्यादरम्यान मुरबाड मध्ये ऐकायला मिळाला. येथील रहिवासी गजानन सुरोशी हे काही वर्षांपूर्वी डोळ्याच्या आजाराने ग्रस्त होते. पण आर्थिक अडचण असल्यामुळे त्यांना डोळ्याचे ऑपरेशन करणे शक्य होत नव्हते. त्यामुळे सुरोशी हे अत्यंत त्रासात जगत होते आणि आपण अंध होऊ असे त्यांना वारंवार वाटत होते.

सुदैवाने ते जिजाऊ संघटना आणि निलेश सांबरे यांच्या संपर्कात आले आणि तिथून त्यांच्या नशिबाने कलाटणी घेतली. जिजाऊचे स्वयंसेवक त्यांना तातडीने झडपोली येथील जिजाऊच्या श्री भगवान महादेव सांबरे रुग्णालयात घेवून गेले. येथे त्यांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रिया आणि औषधोपचार पूर्णपणे मोफत करण्यात आले. तसेच ते पूर्णपणे बरे होईपर्यंत जीजूच्या स्वयंसेवकांनी त्यांची काळजी घेतली. यामुळे आपल्या डोळ्यांना नवा प्रकाश भेटल्याची भावना गजानन सुरोशी यांनी व्यक्त केली.

# ठाणे जिल्ह्यात निवडणूक कामात 'नारी'शक्ती अग्रेसर




●ठाणे : रोजच्या जगण्यात एकाच वेळी अनेक "आघाड्यांवर" यशस्वी काम करण्याचे सामर्थ्य आणि कसब कुणात असेल ती म्हणजे कुटुंबातील "महिला" होय. अवकाशाला गवसणी घालण्याचे धाडस महिलांनी आजपर्यंत अनेक क्षेत्रात दाखवलेच.. नि:पक्षपणे प्रशासन चालवण्यातही महिलांनी आपली कर्तव्य दक्षता सिध्द केली आहे. म्हणूनच ठाणे जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघात आदर्श निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करून निवडणुका पार पाडण्याचे काम जिल्ह्यातील महिला अधिकारी समर्थपणे सांभाळत आहेत. एका अर्थाने नारीशक्तीच निवडणुकीचे शिवधनुष्य यशस्वीपणे पेलताना दिसत आहेत.

देशात लोकसभा निवडणुका सर्वत्र सुरू आहेत. ठाणे जिल्ह्यात पाचव्या टप्प्यात निवडणुका होत असून यासाठी ठाणे जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. ठाण्यातील 24 कल्याण लोकसभा मतदारसंघ आणि 25 ठाणे लोकसभा मतदारसंघात निवडणूक निर्णय अधिकारी या पदावर महत्त्वाच्या पदावर महिला अधिकारी सक्षमपणे काम करीत आहेत. ठाणे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी अर्चना कदम या संपूर्ण जिल्ह्याच्या निवडणूक कामावर लक्ष ठेवत आहेत.

निम्म्या मतदारसंघात महिलांकडे जबाबदारी

ठाणे लोकसभा मतदारसंघात 6 विधानसभा मतदारसंघ असून तीन विधानसभा मतदारसंघात सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महिला अधिकारी समर्थपणे कामकाज सांभाळत आहेत. 146 ओवळा माजिवडा येथे उपजिल्हाधिकारी शीतल देशमुख, 148 ठाणे विधानसभा मतदारसंघासाठी उपविभागीय अधिकारी उर्मिला पाटील, 150 ऐरोली विधानसभा मतदारसंघासाठी उपजिल्हाधिकारी सुचिता भिकाणे या कामकाज पाहत आहेत.

तर कल्याण लोकसभा मतदारसंघात 143 डोंबिवली विधानसभा मतदारसंघात उपजिल्हाधिकारी वैशाली परदेशी आणि 24 कल्याण विधानसभा मतदारसंघात वैशाली लंभाते यांच्याकडे सहाय्य निवडणूक निर्णय अधिकारी पदाची जबाबदारी आहे. 23 भिवंडी लोकसभा मतदारसंघातील 139 मुरबाड विधानसभा मतदारसंघात अंजली पवार यांच्याकडे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी पदाची जबाबदारी असून त्या समर्थपणे ही जबाबदारी पार पाडत आहेत.

तसेच भिवंडी लोकसभा मतदारसंघात तहसीलदार कोमल ठाकूर, कल्याण लोकसभा मतदारसंघात तहसीलदार प्रशांती माने, तहसीलदार कल्याणी मोहिते, तहसीलदार स्वाती घोंगडे, ठाणे लोकसभा मतदारसंघात आसावरी संसारे यांच्याकडे अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पदाची जबाबदारी आहे.

जिल्हा निवडणूक कार्यालयातही महिला अधिकाऱ्यांकडे महत्त्वाची जबाबदारी सोपविलेली आहे. यामध्ये तहसीलदार उज्ज्वला भगत, नायब तहसीलदार स्मितल यादव, निलिमा मेंगळ, हेमलता भोये यांचा समावेश आहे.

याशिवाय निवडणूक विषयक माहिती प्रसारमाध्यमांमार्फत जनतेपर्यंत पोचविण्याचे कामही महिला अधिकारी सक्षमपणे सांभाळत आहेत. ठाणे महानगरपालिकेच्या उप माहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर या 25 ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या प्रसिद्धीची जबाबदारी सांभाळत आहेत तर कल्याण लोकसभा मतदारसंघात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे या ही जबाबदारी सांभाळत आहेत. तसेच ठाणे जिल्हा परिषदेच्या जनसंपर्क अधिकारी रेश्मा आरोटे याही एकत्रित माध्यम कक्षात प्रसिद्धीचे कामकाज सांभाळत आहेत.

ठाणे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसभा निवडणुकांचे काम सुरू आहे. भारत निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याचे काम या जिल्ह्यातील नारीशक्ती करीत आहे. स्वतःचे घरसंसार सांभाळात दिवसरात्र या महिला अधिकारी निवडणुकीचे काम अतिशय जबाबदारीने सांभाळत आहेत.

निवडणुकीसाठी रिंगणात असलेल्या उमेदवारांचे अर्ज दाखल करुन घेण्यापासून ते त्यांची अंतिम यादी तयार करणे, मतदान केंद्रे निश्चित करुन त्या ठिकाणी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे. मतदान केंद्रावर निवडणुकीसाठी लागणाऱ्या ईव्हीएम मशीन्स, बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आदींची उपलब्धतता करुन देणे, तसेच राखीव मशीन्स ठेवणे आदी सर्व कामांचाआढावा स्वत: निवडणूक निर्णय अधिकारी घेत आहेत. निवडणुकांसाठी ठाण्यात दाखल झालेले केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक यांच्याशी समन्वय साधणे. तसेच अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना मतदान करता यावे यासाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देणे, 85 वर्षावरील व दिव्यांग व्यक्ती ज्या मतदान केंद्रापर्यत पोहचू शकत नाही अशा नागरिकांसाठी गृहमतदानाची सोय उपलब्ध करणे, अंध मतदारांसाठी ब्रेल लिपीतील व्होटर स्लीपची सोय करणे, जिल्हा प्रशासन करत असलेल्या कामांची प्रसार माध्यमांमार्फत जनतेपर्यंत माहिती पोचविणे आदी सर्व जबाबदारी या महिला अधिकारी चोख पार पाडत आहेत.

### निवडणूक निर्णय अधिकारी पदाची जबाबदारी

24 कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी पदाची धुरा उपजिल्हाधिकारी सुषमा सातपुते यांच्याकडे असून 25 ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी पदाची धुरा अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये धुळे यांच्याकडे आहे.

## शहापूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत मतदानाचा टक्का वाढीसाठी जनजागृती

● ठाणे - मतदान हे प्रत्येकाचे राष्ट्रीय कर्तव्य असून मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकांनी बजावावा. आपले मत अमूल्य असून मतदान करून आपण आपली लोकशाही बळकट करा.. मतदार राजा जागा हो.. लोकशाहीचा धागा हो.. अशी जनजागृती शहापूर मधील आदिवासी वाड्या, पाडया, वेगवेगळ्या गावांमध्ये जाऊन, आदिवासी मुलांमुलींचे शासकीय वसतीगृह, शासकीय/अनुदानित आश्रमशाळांमध्ये करण्यात आली.

१३५ शहापूर (अ.ज.) विधानसभा मतदार संघामध्ये आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मतदान टक्केवारी वाढविण्याकरीता व्यापक प्रमाणात जनजागृती करणेबाबतचे विविध उपक्रम आले. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय शहापूर तथा स्वीप नोडल अधिकारी श्री. आर. बी. हिवाळे यांनी, विविध मतदार जनजागृती उपक्रम राबवून मतदान करण्याबाबत आवाहन केले. दिव्यांग व वृध्द मतदार, नवीन मतदार, विविध सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच सहा. निबंधक सहकारी संस्था मिरची गल्ली, हॉटेल संघटना शहापूर, शहापूर मार्केट. ता. शहापूर, वैद्यकीय व्यावसायिक, ज्वेलर्स असोसिएशन, ट्युशन क्लासेस व्हीजन अकॅडमी विश्वानंद संकुल पंडीत नाका या ठिकाणी मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच सावरोली, कोठारे, सुसरवाडी, दहागावं, पिवळी, टेंभा, शेणवा, डोळखांब, टाकीपठार येथील शासकीय आश्रमशाळा, जिल्हा परिषदेच्या विविध शाळा येथे पायी रॅली उपक्रम राबविण्यात आला असून मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली आहे. तसेच आईबाबांना पत्र, चर्चासत्र, यांसारखे महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात आले. तसेच नाभिक संघटना शहापूर, वकील संघटना आसनगाव रेल्वे स्टेशन, शहापूर बस स्थानक, आशीर्वाद हॉटेल चौक, स्मार्ट पॉईंट, बिकानेर स्वीट मार्ट, नर्सिंग कॉलेज इ. गर्दीच्या ठिकाणी मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. सापगांव, साखरोली येथील विटभट्टी कामगारांना मतदानाबाबतचे महत्त्व सांगून मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. मतदारांना त्यांचे नाव मतदार यादीत तपासता यावे व त्यांचे मतदान केंद्राची माहिती व्हावी याकरीता मतदान चिठठ्या बीएलओ मार्फत वाटप करण्यात येतील व मतदानाचे महत्त्व सांगून जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच १७/०५/२०२४ व १८/०५/२०२४ रोजी शाळा व महाविद्यालयांमार्फत पालकांना मतदान करण्याबाबतचे आवाहन करणारे संदेश व्हॉटस ॲप द्वारे पालकांना पाठवून मतदानांबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, पेंढरघोळ येथे आदिवासी संस्कृतीचे आदर्श मतदान केंद्र बनविण्यात येत असून तेथे सेल्फी पॉईंटची स्थापना करणे, आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणा-या विविध वस्तूंची मांडणी करणे, वारली पेंटींग, आदिवासी बोलीभाषेत बॅनर बनविणे, आदिवासी वेशभुषा, आदिवासी पथनाटय बसविणे, मतदान करण्यासाठी येणा-या लोकांना पुष्प देऊन स्वागत करणे इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती एकात्मिक आदिवासी प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी श्री.आर.बी.हिवाळे यांनी दिली.



## उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व माहिती एका क्लिकवर; डेटा-बेसचा डेमो सादर

●उल्हासनगर - नागपूरच्या संस्थेने महानगरपालिके सोबत शहराचा डेटा-बेस तयार करण्याचा करार असून हे काम अंतिम टप्प्यात आले आहे.या डेटा-बेसचा डेमो स्थायी समिती सभागृहात सादर करण्यात आला असून त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका हद्दीच्या आतील सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

महानगरपालिकेने शहराचा डेटा-बेस तयार करण्यासाठी नागपूर मधील महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग एप्लीकेशन संस्थे सोबत केलेला आहे.या संस्थेने 80 टक्के डेटा बेसचे काम पूर्ण केले आहे.यात शहराची हद्द,टोटल इमारतींची संख्या,

सर्व लहान मोठ्या रोडची लांबी रुंदी,विद्युत पोल,रिकामे भूखंड, उद्याने, बाजारपेठा, शाळा, कॉलेज ,पाणी पुरवठ्याच्या लाईनी,भुयारी गटारी आदींचा समावेश आहे.डेटा-बेसमध्ये अनधिकृत बांधकाम नियमित करताना ते बांधकाम 2005 पूर्वीचे आहे किंवा नाही हे निश्चित करणे सोईचे होणार आहे. शहरामध्ये रस्त्यांचे काम सुरू आहे. त्यानुसार त्याचे मार्किंग करणे,शिवाय एखादया इमारतीचे,जागेचे नेमके किती क्षेत्र विकास आराखड्यातील रोडने बाधित होत आहे हे सुद्धा निश्चित करणे शक्य होणार असून त्यामुळे कुणावरही अन्याय होणार नाही याचा सुद्धा कटाक्ष राखला जाणार आहे. ही सर्व अचूकता ड्रोन प्रतिमेद्वारे तयार केलेल्या जीआयएस डेटावरून ठरविणे शक्य होणार आहे.याशिवाय विकास आराखडा डेव्हलप करण्यासाठी कोणकोणत्या बाबी आवश्यक आहेत हेही स्पष्ट होणार आहे.

## शहापुरात इको सेन्सिटिव्ह झोनची टांगती तलवार

शहापूर : पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील समजल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील तानसा अभयारण्याच्या परिघात मोडणाऱ्या ६४ गावांतील ६२५.३०० चौरस किलोमीटर क्षेत्र इको-सेन्सिटिव्ह झोन म्हणून संरक्षित करण्याचा निर्णय केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाने घेतला आहे. हा परिसर इको-सेन्सिटिव्ह झोन म्हणून जाहीर झाल्यानंतर ६४ गावांसह त्यांच्या क्षेत्रापासून एक ते नऊ किलोमीटर परिघात नव्याने उभ्या राहणाऱ्या दगडखाणी, आरागिरणी, वीटभट्ट्या, जलविद्युत प्रकल्पांसह नव्या बांधकामांवर गंडांतर येणार आहे.

यामुळे या भागात सेकंड होमचे स्वप्न दाखवणाऱ्या बिल्डरांचे मोठमोठे प्रकल्पही अडचणीत आले आहेत. आता इको-सेन्सिटिव्ह झोनची पूर्वतयारी म्हणून केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाने यासंबंधी केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाने ७ मे २०२४ ला राजपत्र जाहीर केले आहे. यावर हरकती नोंदवण्यासाठी ६० दिवसांचा अवधी दिला आहे.

# बेलापूर ते दिघापर्यंत अवघे २३९ होर्डिंग अधिकृत

● नवी मुंबई : घाटकोपर येथे वादळीवाऱ्यात महाकाय होर्डिंग कोसळून झालेल्या अपघातानंतर नवी मुंबई महापालिका यंत्रणा सरसावली आहे. शहरातील बेकायदा होर्डिंगचा शोध अतिक्रमणविरोधी पथकाने सुरू केला आहे.

या पथकाच्या सर्वेक्षणात बेलापूर ते दिघापर्यंत अवघे २३९ होर्डिंग अधिकृत परवानाधारक असल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रत्यक्षात शहरात हजारो होर्डिंग बेकायदा उभे असल्याने त्यावर अतिक्रमणविरोधी पथकामार्फत लवकरच हातोडा चालवण्यात येणार आहे.

जाहिरातबाजी करण्यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी



महाकाय होर्डिंग उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. त्यातून महापालिकेला उत्पन्न मिळते. त्यामुळे पालिकेतर्फेही होर्डिंग उभारण्याकरिता जाहिरात कंपन्यांना परवानगी दिली जाते. होर्डिंग उभारण्यापूर्वी नियमांची पूर्तता करण्याच्या सूचना महापालिकेने संबंधितांना केल्या आहेत. नवी मुंबई महापालिका आयुक्तांनी संबंधित यंत्रणांना परवाने, नूतनीकरण आणि संरचना स्थैर्यता प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते.

### २०२२-२३ पासून बेकायदा उभे असणारे होर्डिंग

- वाशी गावातील रस्त्याच्या लगत असणारे मोठे ६००, ८०० आणि ४०० चौरस फुटांचे असे एकूण सहा होर्डिंग पाडण्याचे आदेश महापालिकेने अतिक्रमणविरोधी विभागाला दिले आहेत.
- ऐरोली सेक्टर नऊ येथील प्रियांका हौसिंग सोसायटी येथे ६०० चौरस फुटाचे होर्डिंग.
- ऐरोली सेक्टर नऊ येथील वंदना अपार्टमेंट येथे ८०० चौरस फुटाचे होर्डिंग.
- ऐरोली सेक्टर नऊ येथील साईदीप अपार्टमेंट येथे ५२५ चौरस फुटाचे होर्डिंग.
- कोपरखैरणे सेक्टर दोन येथील पूजा अपार्टमेंटजवळ ६०० चौरस फूट आकाराचे होर्डिंग.
- वाशी सेक्टर नऊ येथे कैलास शिखर सोसायटीजवळ ६०० चौरस फुटाचे होर्डिंग.
- वाशी सेक्टर नऊ येथील एकता सोसायटी येथे ६०० चौरस फुटाचे होर्डिंग.
- वाशी सेक्टर २८ येथे ६०० आणि ८०० चौरस फुटाचे दोन होर्डिंग.
- नेरूळ सेक्टर एक येथे ८०० आणि ६०० चौरस फुटाचे दोन होर्डिंग.

# ठाणे जिल्ह्यात वळिवाच्या सरी



● ठाणे : जिल्ह्यात गुरुवारी सकाळी तापमानाचा पारा ३४ अंश डिग्री सेल्सिअस वर होता. कडाकाच्या उन्हामुळे नागरिक हैराण झाले असतानाच, सायंकाळी अचानक ठाणे, डोंबिवली, कल्याण, नवी मुंबई तसेच काही ग्रामीण भागात सोसाट्याचा वारा त्यासह आभाळ भरून आले. त्यानंतर साडेपाच वाजण्याच्या सुमारास पावसाच्या सरी कोसळल्या. उष्णतेमुळे त्रासलेल्या नागरिकांना या वळीवाच्या पावासामुळे काहीसा दिलासा मिळाला.

ठाणे जिल्ह्यात सोमवारी झालेल्या वादळी वाऱ्यांसह जोरदार पावसानंतर दोन दिवस उष्णतेची लाट पाहायला मिळाली. जिल्ह्यातील तापमानाचा पारा वाढला होता. त्यामुळे तापमानात उष्णता जाणवत होती. या उष्णतेमुळे नागरिकांच्या जिवाची काहिली झाली होती. ठाणे शहरात गुरुवारी ३७ अंश डिग्री सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली होती.

गुरुवारी सायंकाळी पावसाच्या हलक्या सरी ठाणे शहरात कोसळण्यास सुरुवात झाली. ठाणे शहरात गुरुवारी १.०२ मिमी पावसाची नोंद ठाणे महापालिका आपत्ती विभागाकडून करण्यात आली आहे. तर, कल्याण -डोंबिवलीमध्येही सायंकाळी ५ वाजल्यापासून सोसाट्याचा वारा आणि ढगाळ वातावरण झाले होते. एक तासानंतर याठिकाणी पाऊस झाला. त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. तर, बदलापूर अंबरनाथ तसेच शहापुरमध्येही पाऊस झाला. तर, नवी मुंबईतही पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या.

### ठाकरेंच्या सभे दरम्यान पाऊस

उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांची डोंबिवलीतील भागशाळा मैदानात गुरुवारी सायंकाळी ६ वाजता जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी पाच वाजल्यापासून डोंबिवलीत सोसाट्याचा वारा आणि ढगाळ वातावरण होते. त्याचवेळी कार्यकर्ते आणि नागरिकांनी सभास्थळी गर्दी केली होती. सभेवेळी अचानक पाऊस कोसळू लागल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. पावसात नागरिक खुर्च्या डोक्यावर घेऊन उभे सभा ऐकत होते.

# MI ने रोहित-हार्दिकला रिलीज करावं, सूर्या किंवा बुमराहला कर्णधार करा',

## सेहवाग आणि तिवारीने दिला मोठा सल्ला

मुंबई इंडियन्स आज आयपीएल २०२४ मधील शेवटचा सामना खेळत आहे. हा हंगाम मुंबईसाठी खूपच खराब राहिला. या हंगामात हार्दिक पंड्याच्या नेतृत्त्वाखालील मुंबईच संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडणारा संघ ठरला. यंदाच्या मोसमातील संघाचा कर्णधार हार्दिक पंड्या आणि माजी कर्णधार रोहित शर्मा यांची कामगिरीही काही विशेष राहिलेली नाही. रोहितने या हंगामात काही प्रसंगी धावा केल्या असल्या तरी हार्दिकने बॅट आणि बॉल या दोन्ही बाबतीत निराश केले आहे. आता टीम इंडियाचे माजी फलंदाज वीरेंद्र सेहवाग आणि मनोज तिवारी यांनी रोहित आणि हार्दिकबद्दल मोठे वक्तव्य केले आहे.



IPL 2024 च्या लिलावापूर्वी मुंबई इंडियन्सने हार्दिक पाड्याला संघाचा नवा कर्णधार म्हणून नियुक्त केले होते. मात्र हार्दिकच्या नेतृत्वाखाली संघाची कामगिरी खराब राहिली. हा संघ प्लेऑफमध्येही पोहोचू शकला नाही. मुंबईच्या शेवटच्या सामन्यापूर्वी क्रिकबझशी बोलताना सेहवागने थेट बॉलीवूडचे उदाहरण देत मोठे वक्तव्य केले.

वीरेंद्र सेहवाग मुंबई इंडियन्सच्या खेळाडूंवर भडकला

सेहवाग म्हणाला, "शाहरूख खान, आमिर खान, सलमान खान हे तिन्ही सुपरस्टार एकाच चित्रपटात असतील तर तो चित्रपट हिट ठरेल हे कोणी खात्रीपूर्वक सांगू शकत नाही. तुम्हाला त्यासाठी चांगलं काम करावं लागेल. बरोबर? त्यासाठी चित्रपटाची स्क्रिप्टही चांगली हवी. त्याचप्रमाणे या संघातील सर्व मोठ्या खेळाडूंना एकत्र येऊन चांगली कामगिरी करावी लागेल. रोहित शर्माने एक शतक झळकावले पण तोही सामना मुंबई इंडियन्सने गमावला होता. मग इतर सामन्यातील कामगिरी कुठेय?"

पुढे सेहवाग म्हणाला, "इशान किशन यंदाचा संपूर्ण हंगाम खेळला पण तो एकदाही पॉवरप्लेच्या पुढची षटके खेळू शकला नाही. सध्याच्या घडीला मुंबई इंडियन्ससाठी दोनच नाव महत्त्वाची आहेत, ती म्हणजे जसप्रीत बुमराह आणि सूर्यकुमार यादव. मुंबईसाठी रिटेन करण्याच्या यादीतील ही दोन आघाडीची नावे आहेत. "


मनोज तिवारीचे रोहित शर्मावर मोठे वक्तव्य

सेहवागनंतर टीम इंडियाचा माजी क्रिकेटर मनोज तिवारीने ही मुंबईच्या खेळाडूंवर वक्तव्य करत सांगितले, "माझ्या मते, सूर्यकुमार यादव आणि जसप्रीत बुमराह हे दोन खेळाडू आहेत ज्यांना मुंबई इंडियन्स आयपीएल मेगा लिलाव २०२५ मध्ये रिटेन करू शकतात. यापलीकडे कोणीही नाही आणि कोणताच विदेशी खेळाडूसुध्दा नाही. मुंबई इंडियन्सनने बुमराह आणि सूर्यकुमार यादवला संघात कायम ठेवावे आणि पुढील हंगामात या दोघांपैकी एकाला संघाचा कर्णधार करावे. माझ्यामते रोहितलाही रिटेन करू नये, कारण त्याच्या कामगिरीकडे पाहता त्याला मुंबईने पुढील हंगामासाठी रिटेन करू नये अशी त्याची इच्छा आहे."

# कान फिल्म फेस्टिव्हल २०२४'मध्ये सिद्धार्थ जाधवच्या 'या' मराठी चित्रपटाचं स्क्रीनिंग, पोस्ट करत म्हणाला...

मराठी रंगभूमी व सिनेसृष्टीत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणारा आणि सध्याचा आघाडीचा अभिनेता म्हणजे सिद्धार्थ जाधव. सिद्धार्थने आपल्या जबरदस्त अभिनयाने, विनोदी शैलीने मराठी रसिक प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. सिद्धार्थने आपल्या अभिनयाची छाप हिंदी सिनेसृष्टीतही उमटवली आहे. अशा हा हरहुन्नरी अभिनेत्याचा एक चित्रपट 'कान फिल्म फेस्टिव्हल २०२४'मध्ये दाखवण्यात आला. ही अत्यंत अभिमानस्पद बाब आहे. यासंदर्भात सिद्धार्थने स्वतः सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून माहिती दिली आहे.

बहुचर्चित असा 'कान फिल्म फेस्टिव्हल २०२४' सध्या जोरदार सुरू आहे. १४ मेपासून सुरू झालेला 'कान फिल्म फेस्टिव्हल' २५ मेपर्यंत असणार आहे. या फेस्टिव्हलला अनेक दिग्गज कलाकार मंडळी पाहायला मिळत आहेत. काल, बॉलीवूडची सौंदर्यवती, अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चन कानच्या रेड कार्पेटवर अवतरली. तिच्या ग्लॅमरस लूकने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. सध्या तिचे कानमधील फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होतं आहे.





कालच 'कान फिल्म फेस्टिव्हल'मध्ये सिद्धार्थ जाधवचा 'हजार वेळा शोले पाहिलेला माणूस' चित्रपट दाखवण्यात आला. तसंच १९ मेला देखील दाखवण्यात येणार आहे. यासंदर्भात पोस्ट करत सिद्धार्थने लिहिलं," #आपलामराठीसिनेमा 'कान फिल्म फेस्टिव्हल'बद्दल खूप वेळा ऐकलं होतं. जेव्हा जेव्हा इथे आपला 'मराठी सिनेमा' गेलाय तेव्हा तेव्हा अभिमान वाटायचा. 'कान फिल्म फेस्टिव्हल २०२४'मध्ये 'हजार वेळा शोले पाहिलेला माणूस' या चित्रपटाचे स्क्रीनिंग होत आहे आणि मी त्या सिनेमाचा भाग आहे. खूप आनंद झाला आहे." पुढे सिद्धार्थ लिहिलं, ""कान फिल्म फेस्टिव्हल'मध्ये जिथे जगभरातून गौरविलेले सिनेमे येतात आणि बघितले जातात...तिथे आपल्या 'मराठी सिनेमाचं स्क्रीनिंग होत आहे याचा मला खूप आनंद आहे...धन्यवाद 'हजार वेळा शोले पाहिलेला माणूस' चित्रपटाची टीम. खूप छान वाटतंय. असंच प्रेम ठेवा. हा सिनेमा लवकरात लवकर तुमच्यासमोर सादर व्हावा याची मी आतुरतेने वाट पाहतोय... लव्ह यू...थँक्यू..." सिद्धार्थच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. अभिनेत्यावर कौतुकाचा व शुभेच्छांचा वर्षाव केला होतं आहे. दरम्यान, 'कान फिल्म फेस्टिव्हल'साठी अभिनेत्री छाया कदम काही दिवसांपूर्वी मुंबईतून रवाना झाल्या. त्यांचा विमानतळावरील फोटो सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला आहे.

# इशान किशन आणि टीम डेव्हिडचं चाललंय तरी काय?

## सराव सोडून दोघात रंगला कुस्तीचा फड, VIDEO होतोय व्हायरल



आयपीएल २०२४ च्या मोसमातील शेवटचा सामना खेळण्यासाठी मुंबई इंडियन्सचा संघ सज्ज झाला आहे. मुंबई इंडियन्सचा संघ यंदाच्या हंगामात सुमार कामगिरीमुळे आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. १७ मे रोजी म्हणजेच शुक्रवारी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध शेवटचा सामना खेळणार आहे. मुंबई इंडियन्स या मोसमातील शेवटचा सामना त्यांच्या घरच्या मैदानावर जिंकून किमान चाहत्यांना आनंदाचे क्षण देण्याचा प्रयत्न करतील. घरच्या मैदानावरील या अखेरच्या सामन्यासाठी संघ तयारी करत आहे. मात्र, याआधी मुंबईने एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये त्यांचे दोन खेळाडू कुस्ती करताना दिसत आहेत.

# हैदराबादमध्ये पावसाची जोरदार हजेरी

## SRH vs GT सामना रद्द झाल्यास कोणाला बसणार फटका?

आयपीएल २०२४ मधील प्लेऑफची शर्यत चांगलीच चुरशीची झाली आहे. सध्या कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स हे दोन संघ प्लेऑफसाठी पात्र ठरले आहेत. यंदाच्या मोसमात मोठे विक्रम रचत शानदार खेळी केलेल्या हैदराबाद संघालाही प्लेऑफचे तिकीट मिळवण्याची मोठी संधी आहे. हैदराबाद संघाचे अजून दोन सामने बाकी असून आज म्हणजे १६ मे रोजी संघाचा महत्त्वाचा सामना गुजरात टायटन्सविरूद्ध खेळवला जाणार आहे. पण या सामन्यापूर्वी हैदराबादमध्ये जोरदार पाऊस पडत आहे. या पावसामुळे सामना रद्द झाल्यास कोणत्या संघाला याचा फटका बसणार जाणून घ्या.



हैदराबादमध्ये आज दुपारी वाऱ्यासह पावसाच्या सरींनी जोरदार हजेरी लावली. सामना सनरायझर्स हैदराबाद वि गुजरात टायटन्सचा महत्त्वाचा सामना हैदराबादच्या राजीव गांधी क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. हैदराबादमधील पावसाचे काही फोटो, व्हीडिओही समोर आले आहेत. सामन्याच्या वेळेत म्हणजेच ७ ते ११ च्या दरम्यानही पावसाची ५० टक्केच्या आसपास शक्यता आहे. आता प्रश्न हा आहे की पावसामुळे हा सामना रद्द झाल्यास प्लेऑफच्या समीकरणावर याचा कसा परिणाम होईल. गुजरात टायटन्सचा संघ आधीच प्लेऑफच्या शर्यतीत बाहेर पडला आहे. त्यामुळे हा सामना रद्द झाल्यास त्यांनी काहीच फटका बसणार नाही. हैदराबाद-गुजरातमधील सामना पावसामुळे रद्द झाल्यास दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळेल.

पण हैदराबादचा संघ सध्या १४ गुणांसह चौथ्या क्रमांकावर आहे, त्यामुळे उर्वरित दोन्ही सामने जिंकून त्यांना क्वालिफायर-१ खेळण्याची चांगली संधी आहे. हैदराबादला हा सामना रद्द होऊन १ गुण मिळाल्यास संघ १५ गुणांवर पोहोचेल इथूनही त्यांना प्लेऑफचे तिकीट नक्की आहे.

# "तुझ्यासारख्या दिग्गज, बलाढ्य अभिनेत्रीसमोर...", मुक्ता बर्वेच्या वाढदिवसानिमित्त नम्रता संभेरावने लिहिली सुंदर पोस्ट

मराठी कलाविश्वात सध्या परेश मोकाशी दिग्दर्शित 'नाच गं घुमा' चित्रपटाची जोरादार चर्चा चालू आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर पहिल्या दोन दिवसांतच दमदार ओपनिंग केली होती. त्यामुळे सध्या या चित्रपटातील सगळ्याच कलाकारांवर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

'नाच गं घुमा' चित्रपटात लोकप्रिय अभिनेत्री मुक्ता बर्वे आणि अभिनेत्री नम्रता संभेराव यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने दोघींनीही प्रेक्षकांच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली आहे. या दोघींची ऑनस्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांना



चांगलीच भावली. परंतु, सगळयात महत्त्वाचं म्हणजे यांचं ऑफस्क्रीन बॉण्डिंग सुद्धा तेवढंच घट्ट झाला आहे. आज मुक्ता तिचा ४५ वा वाढदिवस साजरा करत आहे. यानिमित्ताने नम्रताने खास पोस्ट शेअर करत तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. 'मुक्ता ताई तुला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! तू माझ्यासाठी माझी खूप मोठी प्रेरणा आहेस. तुझी सगळी स्वप्न पूर्ण होवोत. आपला सिनेमा सुपरहिट झाला ताई...तुझ्यासारख्या दिग्गज, बलाढ्य अभिनेत्रीसमोर उभं राहण्याची ताकद मला तुझ्यामुळेच मिळाली. कारण, तू खूप आपलंस केलंस मला आधार दिलास. मला एवढं बळ दिल्याबद्दल मनापासून धन्यवाद! मी तुझी खूप मोठी फॅन झाले आणि आता तू माझी मैत्रीण सुद्धा झालीस त्यामुळे माझी कॉलर पण टाइट झालीये...लव्ह यू सो मच ताई!" अशी सुंदर पोस्ट नम्रताने मुक्ता बर्वेसाठी लिहिली आहे. या पोस्टबरोबर नम्रताने दोघींचा पैठणी साड्यांच्या ड्रेसमधील सुंदर असा एक फोटो शेअर केला आहे. नम्रताप्रमाणे मराठी कलाविश्वातील असंख्य कलाकार आज मुक्ता बर्वेला वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत आहेत.

# वीकेंडसाठी नेटफ्लिक्सवरील सर्वोत्तम ॲक्शन-थ्रिलर चित्रपट अन् वेब सीरिजची यादी



घरबसल्या जगभरातील उत्तम, दर्जेदार कंटेंट आपल्याला वेगवेगळ्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर पाहता येतो. तुम्हाला ओटीटीवर ॲक्शन आणि थ्रिलर चित्रपट, वेब सीरीज पाहण्याची खूप आवड असेल आणि चांगल्या कलाकृतींच्या शोधात तुम्ही असाल तर ही बातमी तुमच्यासाठीच आहे. नेटफ्लिक्सवर अनेक चित्रपट व सीरिज उपलब्ध आहेत, ज्या तुम्ही या वीकेंडला पाहू शकता. नेटफ्लिक्सवरील सर्वोत्तम वेब सीरिजबद्दल आम्ही तुम्हाला आज सांगणार आहोत.

# दिनविशेष

### घटना

२०२२: मोरबी, गुजरात येथील मिठाच्या कारखान्याची भिंत कोसळली, त्यात बारा कामगारांचे निधन तर अनेक बेपत्ता आहेत.

२००९: श्रीलंका - सरकार-एलटीटीई यांच्यातील युद्ध एलटीटीईला पराभूत करून संपले.

१९९८ : सुरेन्द्र चव्हाण - जगातील सर्वोच्च शिखर माऊंट एव्हरेस्ट सर केले.

१९९५ : रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया - स्थानिक बँकेतील ५,००० रुपयांपर्यंतचे धनादेश खात्यात भरल्यानंतर तिसऱ्या दिवशी ती रक्कम ग्राहकास काढण्याची मुभा देण्यात आली.

१९९१ : हेलन शेरमन - ह्या पहिल्या महिला ब्रिटिश अंतराळयात्री बनल्या.

१९९०: फ्रान्स देशातील टीजीव्ही रेल्वेने ५१५.३ किमीताशी वेगाने धावण्याचा नवीन जागतिक विक्रम केला.

१९७४ : स्मायलींग बुद्धा भारत देशाने पहिल्या आण्विक अस्त्राची यशस्वी चाचणी पोखरण, राजस्थान येथे केली. या मिशनचे नाव स्मायलींग बुद्धा असे होते.

### जन्म

१९७९: जेन्स बर्गेनस्टेन - माईनक्राफ्टचे सह-डिझाइन, स्वीडिश व्हिडिओ गेम डिझायनर १९३३ : एच. डी. देवेगौडा - भारताचे ११वे पंतप्रधान

१९२५: इग्नेशियस पॉल पिंटो - भारतीय रोमन कॅथोलिक प्रीलेट (निधन: ८ फेब्रुवारी २०२३)

१९२०: करोल जोझेफ वोजट्यला - पोप जॉन पॉल (दुसरे), २६४वे पोप (निधन: २ एप्रिल २००५)

१९२०: जॉन पॉल (दुसरा) - पोप (निधन: २ एप्रिल २००५)

१९१३: पुरुषोत्तम काकोडकर - गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, काँग्रेसचे नेते (निधन: २ मे १९९८)

१९०९: व्हिन्सेंट डु विग्नॉड - अमेरिकन बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक - नोबेल पारितोषिक (निधन: ११ डिसेंबर १९७८)

### निधन

२०२२: पार्थ घोष - पश्चिम बंगालचे वक्तृत्वकार

२००२ : दुर्गाबाई भागवत - जेष्ठ लेखिका, तत्त्ववेत्या (जन्म: १० फेब्रुवारी १९१०)

२००१ : विभावरी शिरूरकर - लेखिका (जन्म: १८ मार्च १९०५)

२००१ : प्रेम धवन - भारतीय गीतकार पद्मश्री (जन्म: १३ जून १९२३)

१९९८: ऍलन मॅक्लिओड कॉर्मेक - दक्षिण आफ्रिकन-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक (जन्म: २३ फेब्रुवारी १९२४) १९९१: गोपाल नरहर नातूपुणे - लोककवी (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)

१९९१: मन मोहन नातू - लोककवी गोपाळ नरहर तथा (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)

# राशि भविष्य

**मेष** — थोडासा व्यायाम करून तुमचा दिवस सुरू करा - त्यामुळे तुमचे तुम्हालाच चांगले वाटेल - दररोज अशा प्रकारे दिवसाची सुरूवात करा. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल - राहिलेली देणी परत मिळवाल - किंवा नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल.

**सिंह** — तुमचे वैयक्तिक प्रश्न तुमचा मानसिक आनंद हिरावून घेतली परंतु, तुम्ही आवडीचे वाचन करण्यासारखे मानसिक उपाय कराल तर ताणतणावाशी सामना करू शकाल. निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो.

**धनु** — तुम्ही आहार व्यवस्थित घ्या विशेषत: अर्धशीशीच्या रुग्णांनी अन्नसेवन योग्य वेळी न केल्यास त्यांना विनाकारण भावनिक ताणाचा सामना करावा लागेल. भूतकाळातील गुंतवणूकीतून आमदनी वाढणे दृष्टीपथात येईल. पत्नीबरोबर खरेदी करणे आनंददायी ठरेल.

**वृषभ** — आरोग्याकडे थोडे लक्ष देण्याची गरज निर्माण होईल. धनाचे आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते. जोडीदाराला तुमची गुप्त माहिती सांगताना दहा वेळा विचार करा. शक्य असेल तर ती माहिती सांगू नका. कारण तुमची पत्नी ही गुप्त माहिती दुसऱ्या कुणाला तरी सांगण्याची शक्यता आहे.

**कन्या** — आजच्या दिवशी चार भिंतीबाहेरची रम्य भटकंती, मेजवान्या तुमचा मूड चांगला ठेवतील. ज्या लोकांची अजून सॅलरी आलेली नाही आज ते पैश्याला घेऊन खूप चिंतीत राहू शकतात आणि आपल्या मित्राकडून उधार मागू शकतात. एकमेकांचा दृष्टिकोन समजावून घेऊन वैयक्तिक प्रश्न सोडवा.

**मकर** — आयुष्यातील उच्च दर्जाची महानता अनुभवण्यासाठी तुमचे आयुष्य उदात्त बनवा. चिंता करणे विसरून जाणे हे त्यादृष्टीने टाकलेले पहिले पाऊल असेल. ज्या व्यापाऱ्यांचे संबंध परदेशात आहे त्यांना आज धन हानी होण्याची शक्यता आहे म्हणून, आज विचार पूर्वक निर्णय घ्या.

**मिथुन** — आयुष्याबद्दल उदार दृष्टीकोन तयार करा. आपल्या परिस्थितीबद्दल जगण्याबद्दल तक्रारी करुन उदास होण्यात काहीही अर्थ नाही. अशा प्रकारचे लाचार निराश विचार, जगण्यातील मजा आणि आयुष्याकडूनच्या आशा अपेक्षा उद्ध्वस्त करुन टाकतात. दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमत: प्राप्त होईल.

**तूळ** — आणखी आशावादी राहण्यासाठी स्वत:ला प्रवृत्त करा. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास आणि परिवर्तनशीलता, लवचिकता वाढेल, पण त्याच वेळी भीतीपोटी, चिंतेमुळे निर्माण होणाऱ्या द्वेषमूलक वैरभावाचा त्याग करा.

**कुंभ** — तुमच्यातील उच्च आत्मविश्वास आज चांगल्या कामासाठी वापरा. धावपळीचा दिवस असला तरी तुमची ऊर्जा टिकून राहील. भविष्यात जर तुम्हाला आर्थिक रूपात मजबूत बनायचे आहे तर, आज पासूनच धन बचत करा. आपल्या कुटुंबातील नव्या सदस्याच्या आगमनामुळे तुम्ही मोहरून जाल.

**कर्क** — तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. परदेशात असलेली तुमची जमीन आज चांगल्या भावात विकली जाऊ शकते यामुळे तुम्हाला नफा होईल. आज तुम्ही सहभागी झालेल्या सोशल कार्यक्रमात तुम्ही आकर्षणबिंदू ठराल.

**वृश्चिक** — उत्स्फूर्तपणे वागण्यावर नियंत्रण ठेवा आणि दुराग्रही स्वभावावर नियंत्रण ठेवा. खासकरून पार्टीमध्ये त्यामुळे एखाद्याचा मूड खराब होईल. भविष्यात जर तुम्हाला आर्थिक रूपात मजबूत बनायचे आहे तर, आज पासूनच धन बचत करा. तुमचे जीवन बदलण्यासाठी पत्नी मदत करील.

**मीन** — दीर्घ आजाराशी लढा देताना स्वत:वरचा विश्वास हाच तुम्हाला हिरो ठरवू शकतो, हे ओळखा. आजचा दिवस जगण्याचा या भावनेने मनोरंजनावर पैसा आणि वेळ खर्च करण्यावर नियंत्रण ठेवा. मुलांच्या बक्षिस समारंभाचे आमंत्रण हा तुमच्यासाठी आनंदाचा मार्ग ठरु शकतो.

# पुरेसं संख्याबळ असताना अजित पवारांची गरज का लागली?



● मुंबई - विरोधी बाकावर असलेले देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेतील एकनाथ शिंदे यांना हाताशी धरून नवं सरकार स्थापन केलं. सत्तास्थापनेसाठी पुरेसं संख्याबळ असतानाही त्यांनी अजित पवारांनाही आपल्यासोबत घेतलं. अजित पवारांना महायुतीत घेण्यामागंच राजकीय समीकरण काय? याबात देवेंद्र फडणवीस यांनी लोकसत्ताच्या लोकसंवाद कार्यक्रमात खुलासा केला आहे.

अजित पवार यांना बरोबर घेतल्याने पश्चिम महाराष्ट्रातील आमचे नेते व कार्यकर्ते सुरुवातीला नाराज झाले होते. पण त्यांची महिनाभरात समजूत काढण्यात यश आले. एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भाजप असे पुरेसे संख्याबळ असताना अजित पवारांची आवश्यकता का भासली, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, “शरद पवार यांनी विरोधकांची मोट बांधून भाजपाला एकाकी पाडण्याचे प्रयत्न सुरू केले होते. अशा वेळी आम्हालाही रणनीती आखावी लागली. राष्ट्रवादीत आपल्याला काही भवितव्य नाही याची अजित पवारांना खात्री झाली होती. आम्हालाही ताकद वाढवायची होती. त्यातूनच अजित पवार आमच्याबरोबर आले. शेवटी आम्हालाही राजकारण करायचे आहे. अजित पवार बरोबर आल्याने पश्चिम महाराष्ट्रात आमची ताकद वाढली, असे फडणवीस यांनी सांगितले. सिंचन घोटाळ्यावरून अजित पवारांवर भाजपाने आरोप केले होते हे अगदी बरोबर. पण यंत्रणांना त्यांचा थेट सहभाग कुठे आढळला नव्हता, असा दावा फडणवीस यांनी केला.

शेवटी मतांचे गणित महत्त्वाचे

राजकारणात रासायनिक समीकरण (पॉलिटिकल केमिस्ट्री) तसेच मतांचे गणित (अॅरिथमॅटिक्स) महत्त्वाचे असते. आम्ही रसायनांत मजबूत होतो पण गणिताची खात्री नव्हती. म्हणूनच मतांचे गणित जुळविण्यासाठी पक्षाची ताकद वाढवावी लागते.

# एमपीएससी: लिपिक-टंकलेखक परीक्षेतील गोंधळाबाबत मोठा निर्णय




● नागपूर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या लिपिक-टंकलेखक परीक्षेचा घोळ अखेर संपला आहे.आयोगाने यासंदर्भात सविस्तर उत्तर सादर करत उमेदवारांना दिलासा दिला आहे. यामुळे आता मराठी आणि इंग्रजी अशा दोन भाषांचे टंकलेखन प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवारांवर कारवाईचा इशाराही आयोगाने दिला. डिसेंबर २०२३ मध्ये घेतलेल्या महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षेचा निकाल अखेर जाहीर झाला. लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी अखेर प्रसिद्ध झाली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) गुरुवारी निकाल जाहीर केला.

‘एमपीएससी’ने गट-क संवर्गातील ७ हजार ५१० पदांच्या भरतीसाठी परीक्षा घेतली होती. मात्र मुख्य परीक्षा होऊन चार महिन्यानंतरही निकाल घोषित झाला नव्हता. उमेदवार अक्षरशः हवालदील झाले होते. अखेरीस गुरुवारी आयोगाने कौशल्य चाचणीसाठी पात्र उमेदवारांची यादी घोषित करत मोठा दिलासा दिला.

आयोगाच्या शुद्धीपत्रानुसार, टंकलेखन चाचणी संदर्भातील प्रश्न एकचे उत्तर नमूद केले आहे; पण प्रश्न दोनचे उत्तरच नमूद केले नाही किंवा विसंगत उत्तर दिले आहे. अशा विद्यार्थ्यांची टंकलेखन चाचणी कोणत्या भाषेत होईल. :प्रश्न क्रमांक एकच्या उत्तरानुसार त्याच्याकडे ज्या भाषेचे प्रमाणपत्र आहे. त्याच भाषेतून टंकलेखन कौशल्य चाचणी होईल. प्रश्न एकमध्ये इंग्रजी आणि मराठी दोन्ही प्रमाणपत्र असल्याचे पर्याय निवडले आहेत. :मराठी भाषेची टंकलेखन कौशल्य चाचणी होईल. उमेदवाराने टंकलेखन चाचणी संदर्भातील कोणत्याच प्रश्नाचे उत्तर दिले नाही.

उमेदवाराची शैक्षणिक अर्हता तपासून त्याच्याकडे ज्या भाषेचे प्रमाणपत्र आहे त्या भाषेची टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येईल. यापूर्वी एमपीएससीमध्ये असाच प्रकार समोर आला होता. महाराष्ट्र अराजपत्रित गट-क सेवा संयुक्त मुख्य परीक्षा २०२३ कर सहाय्यक या पदाचा कौशल्य चाचणीसाठीचा निकाल प्रसिद्ध केला. त्यात कर सहायक टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी पात्र नसताना काही उमेदवार पात्र ठरविण्यात आले होते. कर सहाय्यक पदासाठी मराठी आणि इंग्रजी दोन्ही टंकलेखन प्रमाणपत्र आवश्यक आहेत. तरीही एक प्रमाणपत्र असलेल्यांना पात्र ठरविण्यात आले आहेत. तसेच एकही टंकलेखन प्रमाणपत्र नसणारे, प्रकल्पग्रस्त ,भूकंपग्रस्त ,पदवीधर, अंशकालीन उमेदवार, माजी सैनिक कर सहायक साठी पात्र केले गेले आहेत. पण हे आरक्षण लिपिक व टंकलेखकांसाठी आहे. ते कर सहाय्यक पदासाठी लागू नाही. म्हणून ते अपात्र असायला हवेत अशी मागणी केली होती.

# मुंबई ते मांडवा जलवाहतुक २६ मे पासून बंद होणार



● अलिबाग : मुंबई ते मांडवा दरम्यान चालणारी जलवाहतुक सेवा २६ मे पासून बंद होणार आहे. पावासाळयाच्या पार्श्वभुमीवर खबरदारी म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचे परिपत्रक मेरीटाईम बोर्डाने जारी केले आहे. दरम्यान भाऊचा धक्का ते मांडवा दरम्यान चालणारी रो रो जलवाहतुक सेवा नियमितपणे सुरु राहणार आहे. मुंबईतील गेट वे ऑफ इंडीया ते मांडवा दरम्यान जल प्रवासी वाहतुक केली जाते. पिएनपी, मालदार आणि अजंठा अशा तीन खाजगी ऑपरेटर्स मार्फत जल वाहतूक सेवा पुरवली जाते. दरवर्षी या मार्गावरून साधारणपणे १२ लाख प्रवासी मार्गावरून ये जा करत असतात. कोकणातील सर्वाधिक प्रवासी संख्या असलेला हा जलमार्ग म्हणून ओळखला जातो. या शिवाय या मार्गावरून खाजगी स्पीड बोटींची मोठ्या प्रमाणात वाहतुक सुरु असते.

पावसाळयात प्रवाश्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ही जल वाहतूक बंद ठेवण्यात येते. या काळात समुद्र खळवळलेला असल्याने बोटींना धोका उद्धवू शकतो त्यामुळे खबरदारी म्हणून तीन महिने ही बोट सेवा बंद ठेवण्यात येत असते. यंदा २६ मे पासून या मार्गावरील सर्व बोटसेवा बंद करण्याचे निर्देश मेरीटाईम बोर्डाने दिले आहेत. त्यानुसार गेट वे ऑफ इंडीया ते मांडवा दरम्यान चालणारी बोट सेवा बंद करण्यात येणार आहे.

# आरटीईच्या प्रवेशासाठी नोंदणी नव्याने सुरू

## ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करण्यासाठी ३१ मेपर्यंत मुदतवाढ




● मुंबई - सन २०२४-२५ या आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रीयेसाठी या पूर्वी दि. १७ एप्रिल पासून ते १० मेपर्यंत बालकांच्या पालकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. तथापि मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही प्रक्रिया स्थगित करण्यात आलेली आहे त्यामुळे मागील वर्षीप्रमाणे आरटीई अंतर्गत नव्याने ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी प्राथमिक बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता आरटीई २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेंतर्गत सर्व पंचायत समिती व महानगर पालिका मध्ये एकूण ६३८ पात्र शाळा असून एकूण ११ हजार ३०९रिक्त जागा उपलब्ध आहेत. ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्यासाठी दिनांक १७ मे ते ३१ मेपर्यंत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सन २०२४-२५ या वर्षासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२ (सी)(१) नुसार दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वंय अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळा, पोलीस कल्याणकारी शाळा (विनाअनुदानीत) आणि महानगरपालिका शाळा (स्वंयअर्थसहाय्यित शाळा) शाळामध्ये आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रीया ऑनलाईन पदधतीने राबविण्यात येणार आहे.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई अंतर्गत यापूर्वी ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या बालकाच्या पालकांनी पुन्हा नव्याने ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. यापूर्वी ऑनलाईन पदधतीने केलेल्या अर्जाच्या सन २०२४-२५ या वर्षाच्या आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रीयेसाठी विचार केला जाणार नाही याची कृपया पालकांनी नोंद घ्यावी असे आवाहन शिक्षण विभाग (प्राथमिक) कडून करण्यात येत आहे.

या प्रक्रियेसाठी पात्र असणाऱ्या (वंचित गट – SC/ST/NT/VJ/OBC/SBC, दुर्बल गट – १ लाखापेक्षा कमी उत्पन्न, दिव्यांग– बालकाचे ४०% अपंगत्व, एच.आय.व्ही. बाधित किंवा एच.आय.व्ही प्रभावित बालके, अनाथ बालके) जास्तीत जास्त पालकांनी प्रवेश प्रकियेत आपल्या बालकांची अर्ज नोंदणी करून या सुविधेचा लाभ घ्यावा.

आरटीई 25% ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेंतर्गत बालकांच्या अर्ज नोंदणीसाठी महाराष्ट्र शासनाकडून https://student.maharashtra.gov.in/adm_portal/Users/rte_index_new या वेबसाईट वर पालकांसाठी मदत केंद्रांची यादी (Help Centers), ऑनलाईन प्रक्रियेत अर्ज नोंदणीबाबत मार्गदर्शक पुस्तिका (User Manual), आवश्यक कागदपत्र इत्यादीबाबत सर्व माहिती शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

# ठाणे पूर धोका नियंत्रण कृती आराखड्याची प्राथमिक रुपरेषा झाली सादर

## ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांचे प्रतिपादन



● ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रात कोणतीही नैसर्गिक आपत्ती येणार असेल तर त्याची आगाऊ सूचना नागरिकांना मिळावी, यासाठी सक्षम यंत्रणा तयार करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. या प्रकारच्या यंत्रणेची आवश्यकता या प्राथमिक कृती आराखड्यामुळे अधोरेखित झाली आहे. एखाद्या आपत्तीचा इशारा मिळाल्यानंतर त्याच्याशी निगडित यंत्रणांनी कशाप्रकारे जलद गतीने त्या आपत्तीचा सामना करावा, त्याचे अपेक्षित परिणाम काय आहेत, याची एक प्रमाणित कार्यपद्धती तयार करण्यास ठाणे पूर धोका नियंत्रण कृती आराखड्याची मदत होईल, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.


ठाणे महापालिका क्षेत्रात अतिवृष्टीच्या काळात साचणाऱ्या पाण्यामुळे निर्माण होणाऱ्या पूर स्थितीचा धोका नियंत्रणात आणण्यासाठी ठाणे पूर धोका नियंत्रण कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. या आराखड्याची प्राथमिक रुपरेषा गुरूवारी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांना सादर करण्यात आली.

अतिवृष्टीच्या काळात सखल भागात साठणारे पाणी, भरतीच्या काळात असताना पावसाच्या पाण्याला खाडीत जाण्यापासून होणारा अडथळा, महापालिका क्षेत्रातील पर्जन्य जल वाहिन्यांचे जाळे, नाल्यातील कचऱ्याचा उपद्रव आदींमुळे वेगवेगळ्या भागात मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. काही प्रसंगात जीवितहानी होण्याचीही भीती असते. या सर्व स्थितीचा अभ्यास करून ही पूर सदृश स्थिती कशी हाताळायची, त्यावर नियंत्रण कसे मिळवायचे याचा कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. ठाणे महापालिकेसाठी कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हार्यन्मेंट अॅण्ड वॉटर (सीईईडब्ल्यू) ही वातावरण बदल क्षेत्रात काम करणारी अग्रगण्य संस्था या कृती आराखड्याचे काम करत आहेत. याच संस्थेने महाराष्ट्र शासन, ठाणे महानगरपालिका यांच्यासोबत ठाणे महापालिका क्षेत्रासाठी उष्णता उपाययोजना कृती आराखडाही (Heat Action Plan) तयार केला आहे. आपत्ती नियंत्रणात प्रत्यक्ष घटनास्थळी काम करणारे कर्मचारी यांचे अद्ययावत प्रशिक्षण आणि नागरिकांमध्ये कमालीची जागरूकता या दोन गोष्टींचाही उहापोह या कृती आराखड्यात करण्यात आला आहे. तो महत्त्वाचा असून एखाद्या आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ हाताशी असल्यास प्रतिसाद जलद देता येतो. त्याशिवाय, माध्यमांच्या मदतीने नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांनाही आपत्तीबाबत सजग करता येते. आवश्यकता असल्यास त्यांचे तात्पुरते विस्थापन करता येते, असेही राव यांनी स्पष्ट केले.

नाल्यात पडणारा कचरा ही शहराची मोठी समस्या आहे. हा कचरा रोखण्यासाठी काय आणि कसे उपाय करता येतील, नागरिकांचे प्रबोधन कसे करता येईल, त्यांना कचरा टाकण्यासाठी सोयीचे कोणते पर्याय देता येतील, याचा विचार करून उपाय सुचवण्याची सूचना आयुक्त राव यांनी ‘सीईईडब्ल्यू’च्या प्रतिनिधींना केली.

सहा महिन्यांपासून या कृती आराखड्याचे काम सुरू आहे. महापालिकेच्या पर्यावरण विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि शहर विकास विभाग यांच्याकडून मिळालेल्या माहिती तसेच, आपत्ती व्यवस्थापनबाबतच्या शास्त्रीय संकल्पना आदींची सागंड घालून सीईईडब्ल्यू यांनी प्राथमिक कृती आराखडा तयार केला आहे. त्यात, पूर स्थितीस कारणीभूत घटक, त्यावरील अल्प आणि दीर्घ कालीन उपाय, त्यातून साध्य होणारा परिणाम आणि नागरिकांना त्याचा होणार उपयोग आदींबाबत मुद्द्यांचा समावेश आहे. हा प्राथमिक अहवाल आता महापालिकेच्या संबंधित सर्व विभागांना देण्यात आला असून त्यावर त्यांची मते आणि सूचना जाणून घेण्यात येणार आहेत. सीईईडब्ल्यूचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी नितीन बस्सी आणि विश्वास चितळे यांनी हा अहवालाचे सादरीकरण करून त्याची प्रत महापालिका आयुक्त सौरभ राव यांना प्रदान केली.

# Ghatkopar hoarding crash: How a son’s call from the US led to his trapped parents’ location



● Mumbai - It was meant to be a quick stop at a Mumbai petrol pump around 4.30 pm on May 13 to refuel their car before driving back home to Madhya Pradesh. However, gusty winds knocked down a 250-tonne hoarding at that exact moment on top of the couple's red sports utility vehicle at the fuel station in Mumbai's Ghatkopar.


Late on Wednesday, nearly 50 hours later, the bodies of retired Air Traffic Control (ATC) general manager Manoj Chansoria, 60, and his wife Anita, 59, were recovered from the car. The time and cause of their deaths are yet to be determined. The hoarding crash has claimed 16 lives so far.

On Thursday, Bhavesh Prabhudas Bhinde, 51, the owner of the hoarding that crashed, was arrested by the Crime Branch from Udaipur. The Ghatkopar hoarding, situated beside a petrol pump in Pant Nagar on Eastern Express Highway, measured 120×120 feet as against the permitted size of 40×40 feet. Bhinde, the director of Ego Media Pvt Ltd, was booked in a rape case by Mumbai Police earlier this year.

## ‘Slapped 7-8 times, kicked on chest and pelvis area’

# Swati Maliwal in FIR against Kejriwal aide Bibhav Kumar



● New Delhi - The Delhi Police FIR against Chief Minister Arvind Kejriwal's aide Bibhav Kumar in connection with the alleged assault on AAP Rajya Sabha MP Swati Maliwal states that she was allegedly slapped 7-8 times, “kicked on the chest, stomach and pelvis area”, and threatened with dire consequences.

According to the FIR, on May 13, Maliwal visited Kejriwal's camp office at his Civil Lines residence where she called and messaged Kumar, but couldn't reach him. As she waited for the CM in the drawing room, Kumar “suddenly barged in, screamed at her without provocation and abused her”, before allegedly assaulting her, it states.

The FIR based on Maliwal's complaint, recorded on Thursday, three days after the incident, states that as Kumar was not present at the CM's house, she went inside the residential area “through the main door, as she has always done in the past year”, and told the CM's staff that she was there to meet him. She was told the CM was “present in the house”, and was asked to wait in the drawing room. A staff member then came and told her that the CM was coming to meet her, the FIR states.

# 5-year-old boy found dead in drain inside Patna school; mob sets building on fire



● Patna - A five-year-old boy was found dead inside the premises of a private school in Patna Thursday evening, leading to protests in the city on Friday as roads were blocked, traffic was disrupted and a portion of the school was set on fire.

A murder case has been lodged and three people have been detained, the police said.

On Thursday, the child left for school at 6 am. After additional school coaching, he was to return home by 2 pm. When he did not return home by 3 pm, his parents and relatives began searching for him. At around 7 pm, the parents approached the police.

After CCTV footage from the school showed the boy going in one direction and not returning, the school administration started a search and found his body in a sewage drain near a classroom.

Quoting some students, the police said the boy had fainted after falling from a slide. “But rather than taking him to hospital, some people from school administration assumed that the boy was dead and put his body in a drain near a classroom,” Kumar's parents alleged in the police complaint.

The school management has yet to issue a statement.

On Friday morning, about 50 people gathered and torched a portion of the school. “We have lodged a murder case. We have so far detained three people and will take action against them after interrogating them. We are also filing a second FIR against locals for arson and causing breach of law and order,” Patna Senior Superintendent of Police Rajeev Mishra said.

